RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




## विधानसभा निवडणूक दिवाळीआधी की दिवाळीनंतर?

### आचारसंहिता ऑक्टोबरमध्ये तर मतमोजणी नोव्हेंबर मध्ये होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

राज्यात सर्वांनाच विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहे. निवडणुका केव्हा होणार? आचारसंहिता केव्हा लागणार? असे प्रश्न सर्वांसमोर आहेत. दरम्यान आता विधानसभा निवडणुकीसंदर्भात मोठी अपडेट समोर आलीय. विधानसभा निवडणुका दिवाळीनंतरच होणार असल्याची माहिती सामटीव्हीला सुत्रांनी दिलीय. तर निवडणूक आचारसंहिता ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात लागू शकते. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मतदान होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिल्याचं समोर आलंय.

नवीन विधानसभा नोव्हेंबरच्या अखेरीस अस्तित्वात येणार असल्याचं समोर येतंय. त्यामुळे आता आणखी काळ वाट पाहावी लागणार असल्याचं कळतंय. सध्या राजकीय नेते विधानसभेच्या कामात गुंतलेले दिसत आहेत. त्यासाठी मोर्चेबांधणी देखील समोर आलीय. तर आता नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मतदान होणार असल्याचं सांगितलं जातंय.




विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता ऑक्टोबरमध्ये तर मतमोजणी नोव्हेंबरमध्ये होणार असल्याचं समोर येत आहे.

**ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता लागणार?**

लोकसभा निवडणुकीत झालेला जोरदार राजकीय संघर्ष सर्वांनीच पाहिला आहे. लोकसभेत महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालंय, तर महायुतीला अपेक्षित यश मिळू शकलं नाही. त्यामुळे विधानसभेत मतांचं गणित बदलणार की लोकसभेची पुनरावृत्ती होणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. दरम्यान मनसे आणि वंचित बहुजन आघाडीने विधानसभेत 'एकला चलो रे'ची भूमिका घेतलीय. निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसलीय, परंतु अजून मतदानाची तारीख, मतमोजणी केव्हा होणार? हे निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या जाहीर केलेलं नाही.

**नवी विधनासभा केव्हा अस्तित्वात येणार?**

यंदा नोव्हेंबर महिन्यामध्ये सुरूवातीला दिवाळी आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीचे मतदान दिवाळी झाल्यानंतर होणार असल्याचं समोर येतंय. तर साधारण १४ किंवा १५ नोव्हेंबरच्या आसपास विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होईल, अशी माहिती सुत्रांकडून मिळत आहे. विधानसभेची मुदत संपण्यापूर्वी किंवा मुदत संपते त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नवी विधनासभा अस्तित्वात येणं आवश्यक असतं. परंतु, सणासुदीच्या काळामध्ये निवडणुका घेतल्या जात नाहीत. त्यामुळे कदाचित निवडणुका दिवाळीनंतर होतील, असं सांगितलं जातंय.

## 'अँटी इन्कम्बन्सी' तपासून तिकीट कापणार लोकसभेच्या निकालावरून भाजपने घेतला धडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नागपूर**

विधानसभा निवडणुकीच्या नियोजनाला लागलेल्या भाजपकडून महायुतीला काहीही करून सत्तेत आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लोकसभेत उमेदवार निवडीत चूक झाल्याचा फटका पक्षाला बसला होता. त्यातून धडा घेत भाजपने विधानसभेसाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्या आमदारांविरोधात जनतेतून 'अँटी इन्कम्बन्सी'चा सूर असेल त्यांचे तिकीट कापण्यात येणार आहे. या मुद्द्याची चाचपणी करण्याचे पक्षाचे हे धोरण निश्चित मानण्यात येत असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघासमोरदेखील हीच भूमिका मांडण्यात आली आहे.



**उमेदवाराची प्रतिमा देखील महत्त्वाची**

निवडणुकीच्या राजकारणात पक्षासोबतच उमेदवाराची प्रतिमादेखील महत्त्वाची असते. कितीही राष्ट्रीय व प्रादेशिक मुद्दे असले तरी स्थानिक मुद्यांमुळे निकाल बदलू शकतो. लोकसभेत हे दिसून आले. बदलत्या राजकारणात उमेदवाराच्या अवतीभोवतीच निवडणूक फिरते, या फडणवीस यांच्या शब्दांतूनच भाजपच्या पुढील दिशेचे संकेत मिळाले. ज्या आमदारांबाबत जनतेत जास्त नाराजीचा सूर असेल त्यांचे तिकीट कापण्यात येण्याचीच दाट शक्यता आहे.

## ... अन्यथा लाडकी बहीण योजना थांबवणार सर्वोच्च न्यायालयाचा शिंदे सरकारला इशारा

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१३मुंबई**

पुण्याचे जमिनीचे प्रकरण शिंदे सरकारच्या महत्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेच्या मुळावर येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यासाठी आज दुपारी २ वाजेपर्यंतचा वेळ सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिला आहे. राज्य सरकारने तोडगा न काढल्यास लाडकी बहीण योजना थांबवणार असल्याचा इशारा न्यायालयाने दिल्याने खळबळ उडाली आहे.

पुणे जमीन अधिग्रहण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या वकिलांना चांगलेच धारेवर धरले आहे. योजनांसाठी पैसे वाटायला तुमच्याकडे पैसा आहे, मग मोबदला देण्यासाठी नाहीय का, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला असून तातडीने निर्णय कळवावा असे सांगितले आहे.

मुख्य सचिवांनी तातडीने मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून पुणे जमीन अधिग्रहण प्रकरणात तोडगा काढावा, असे आदेश न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला दिले आहेत. बी.आर. गवई आणि केजी विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरु आहे. लोकांच्या जमीनी घेतल्यानंतर त्यांना कोणताही मोबदला दिलेला नाही. यामुळे याचिकाकर्त्यांनी कोर्टात धाव घेतली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने योजना जाहीर करून फुकटचे पैसे वाटायला सरकारकडे पैसे आहेत का, असा सवाल करत दुपारी दोन वाजेपर्यंत तोडगा काढावा, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.



सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालावर महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेचे भविष्य ठरणार आहे. याचिकाकर्ते टी एन गोदाबर्मन यांच्या पूर्वजांनी १९५० साली पुण्यात २४ एकर जमीन खरेदी केली होती. राज्य सरकारने ही जमीन घेतली. परंतु याचिककर्त्यांना मोबदला दिला नव्हता. ''आम्ही वृत्तपत्रे वाचतो, आम्हाला गृहीत धरू नका. तुमच्याकडे फ्रीबीजसाठी लाडकी बहीण योजनेला वाटायला पैसे आहेत,'' असेही न्यायमूर्तींनी म्हटले आहे.

## काँग्रेसच्या सीएम पदाच्या चेहऱ्याचे नाव नाना पटोलेंनी जाहीर करावे, स्वागत करु : संजय राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ मुंबई**

राज्यातील विधानसभा निवडणूक ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात होणार असे सर्वत्र मानले जात असताना ही निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात म्हणजे दिवाळीनंतरच होईल, अशी खात्रीलायक माहिती हाती आली आहे. यातच सर्वच पक्षांच्या तयारीला वेग आला आहे. राज्यभरात दौरे, बैठकांचे सत्र सुरू आहे. यातच आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापलेले पाहायला मिळत आहे. तर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक दावे केले जात आहेत. मुख्यमंत्रीपदाचा दावेदार कोण, यावरून महाविकास आघाडीत एकमत नसल्याचे पाहायला मिळत आहे. यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाष्य केले आहे.



नाना पटोले यांची अडचण समजू शकतो. सर्वांची बाजू समजू शकतो. नाना पटोले आमचे मित्र आहेत. आमचे सहकारी आहेत. परंतु, महाराष्ट्राला प्रिय असणाऱ्या चेहऱ्याविषयी बोलतो. नाना पटोले यांच्या मनात एखाद्या व्यक्तीचे नाव असेल तर त्यांनी ते सांगावे. मात्र राज्यातील ११ कोटी लोकांच्या मनात कोणता चेहरा आहे त्याबद्दल बोलत आहे आणि मला त्याबद्दल बोलण्याचा अधिकारही आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

सन २०१९ च्या निवडणुकीनंतर मीच म्हणालो होतो की, उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री होतील. नाना पटोले त्यांच्या जागी बरोबर आहेत. त्यांनी केलेले वक्तव्य बरोबर आहे. महाविकास आघाडीचे सरकार येऊन आमचाच मुख्यमंत्री होणार आहे. दुसऱ्या बाजूला नाना पटोले यांच्याकडे मुख्यमंत्रिपदासाठी दुसरा कोणता चेहरा असेल तर ते त्यांनी जाहीरपणे सांगावे. काँग्रेसकडे मुख्यमंत्रिपदासाठी चेहरा असेल आणि त्यांनी त्याबद्दल जाहीर वाच्यता केली तर त्याला हरकत नसेल. काँग्रेसमध्ये चेहरा असेल तर त्यांनी सांगावे की, हा आमचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आहे. नाना पटोले ज्या नेत्याचे नाव सांगतील आम्ही त्याचे स्वागतच करू, असे संजय राऊत म्हणाले.दरम्यान, काँग्रेसकडे मुख्यमंत्रिपदासाठी चेहरा नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर, तसे नाही, परंतु काँग्रेसने सांगायला हवे. ही लोकशाही आहे. त्यांनी त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा सांगावा. त्यांच्याकडे अनेक नेते आहेत पण काँग्रेसने त्यांची नावे जाहीर करावी. काँग्रेसने १० जणांची यादी जाहीर करावी की आमच्याकडे मुख्यमंत्रिपदासाठी हे १० चेहरे आहेत, असे संजय राऊतांनी सांगितले.

## अनुराधा पौडवाल यांना 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ मुंबई**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत. राज्य सरकारकडून २०२४ च्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे. यासोबतच, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कारांची आणि बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. मंत्री मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञांची समिती या पुरस्कारांची शिफारस करत असते. विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार असून सर्व पुरस्कारार्थींचे मंत्री मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले आहे.



अनुराधा पौडवाल या ज्येष्ठ गायिका आहेत. त्यांनी गायलेली गाणी आणि भजन यामुळे त्या महाराष्ट्रातील प्रत्येक घरात पोहोचल्या आहे. अनुराधा यांनी फक्त गाणी गायली नाहीत. तर त्यांनी आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो या भावनेतून समाजकार्य देखील केलं आहे. अनुराधा पौडवाल यांनी गीत गायनामधून मिळालेल्या पैशांचा उपयोग शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या मदतीसाठी, गरिबांच्या घरांना विजेची जोडणी करुन देण्यासाठी तसेच कुपोषणाच्या समस्यांच्या निवारणासाठी आपल्यापरिने सामाजिक काम केलं आहे. अनुराधा पौडवाल यांच्या संगीत कारकीर्दीबद्दल आणि समाजकार्यबद्दल त्यांना २०१८ मध्ये इंग्लंडच्या संसदेत गौरवण्यात आलं होतं. यानंतर आता महाराष्ट्र सरकारकडून प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने त्यांना गौरवण्यात येणार आहे.

## मी फक्त नावापुरता अध्यक्ष, निवडणुकीत दखल घ्यावी लागेल, बच्चू कडूंचा सरकारला इशारा

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१३ मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरु केली आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडी आणि महायुतीतील सर्वच घटक पक्षांच्या अनेक बैठका सुरु आहेत. तसंच, प्रत्येक पक्षाकडून दावे-प्रतिदावे केले जाऊ लागले आहेत. दरम्यान, महायुतीत सामील असलेल्या प्रहार जनशक्तीचे प्रमुख बच्चू कडू यांनी सरकारला इशारा दिला आहे. मी नाराज नाही पण लोक या सरकारवर नाराज आहे. जर सरकार आमच्या मागण्यांची दखल घेत नसेल तर निवडणुकीत त्यांना दखल घ्यावी लागेल, असा इशारा बच्चू कडू दिला आहे.

याचबरोबर, दिव्यांग अभियानाचा फक्त नावापुरता अध्यक्ष, दिव्यांगांसदर्भातले निर्णयही कळवले जात नाहीत अशी खंत देखील बच्चू कडू यांनी व्यक्त केली.आम्हाला नावापुरता दिव्यांग कल्याण अभियानाचा अध्यक्ष केला आहे. जिल्ह्यात जा आणि तक्रारी घ्या एवढंच आमचं काम आहे. दिव्यांग मंत्रालयाचे काय निर्णय होतात, हे आम्हाला कळवलं सुद्धा जात नाही. अनेक गोष्टींसाठी आम्हाला भांडावं लागतं आणि भांडून आम्ही ते करून घेतो. सरकारनं जर आमच्या मागण्यांची दखल घेतली नाही, तर निवडणुकीतून आम्ही दखल दाखवून देऊ. मी नाराज नाही पण लोक या सरकारवर नाराज आहे.



### बच्चू कडू यांची आमदार रवी राणा यांच्यावर सडकून टीका

लाडकी बहीण योजनेवरून बच्चू कडू यांनी आमदार रवी राणा यांच्यावर निशाणा साधला. लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जाणारा पैसा जनतेचा आहे. पण लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जाणारा पैसा काहींना बाप-दादांच्या कमाईचा पैसा वाटतो, अशी टीका बच्चू कडू यांनी रवी राणांवर केला आहे. बच्चू कडू म्हणाले, काही आमदारांना असं वाटतंय की आपण खूप मेहनत केली, घरदार विकून जो पैसा मिळाला तो आपण या लाडक्या बहिणीसाठी लावला. जनतेचा पैसा आहे, सरकारी पैसा हा सगळा आहे. लोकं कर भरतात, याचा विसर या लोकांना पडला आहे. यांना वाटतं आपल्या बाप दादांच्या कमाईतून ही योजना चालू आहे, हे चुकीचा आहे. सरकार हे लोकांसाठी असतं आणि जर लोकांसाठी सरकार नसेल तर आमचा रक्तातील दोष म्हणा किंवा चांगुलपणा म्हणा, तो राहणारच आहे.

## लाडकी बहीण योजनेचे पैसे परत घेऊ म्हणणाऱ्या रवी राणांना देवेंद्र फडणवीसांनी सुनावलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३जळगाव**

आगामी विधानसभा निवडणुकीत मतरुपी आशीर्वाद न दिल्यास, लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यातून काढून घेईन, असं विधान आमदार रवी राणा यांनी सोमवारी अमरावतीत एका कार्यक्रमात बोलताना केलं होतं. या विधानावरून विरोधकांकडून त्यांच्यावर टीकेची झोड उठवली जाते आहे. दरम्यान, यावरून आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आमदार राणा यांचं नाव न घेता त्यांना सुनावलं आहे. दरम्यान, यावेळी लाडकी बहीण योजनेबाबत केलेल्या विधावरून त्यांनी आमदार रवी राणा यांनीही नाव न घेता सुनावलं. यासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमचे काही मित्र गंमती गंमतीत बोलताना काहीही बोलताना, कुणीतरी म्हणतं पैसे परत घेऊ, पण वेड्यांनो या देशात भाऊबीज कधीच परत घेतली जात नाही. एकदा भाऊबीज दिली, की त्याच्या बदल्यात केवळ प्रेम मिळते. त्यामुळे कुणी मत दिलं किंवा नाही दिलं, तरी ही योजना बंद केली जाणार नाही. कुणाचा बाप ही योजना बंद करू शकत नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## संपादकीय ......

# आव्हानांचा काळ, गरज सतर्कतेची

काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत बदललेल्या हवामानाचा फटका बसू लागला आहे. नैसर्गिक संकटांची मालिकाही काही भागात पाहावयास मिळत आहे आणि देश सक्षमपणे प्रतिकूल स्थितीचा सामना करत आहे. ठिकठिकाणी पाणी जमा होत आहे अणि घाणीचे साम्राज्यही आहे. सर्वात मोठी चिंताजनक बाब म्हणजे विविध आजारांचा संसर्ग आणि त्यामुळे वाढती आजारपणे. ज्या ठिकाणी पाऊस अधिक पडला तेथे आणि जेथे पाऊस कमी पडला तेथेही आजारांचे प्राबल्य दिसून येत आहे.

देशात अनेक प्रकारच्या आजारांचा प्रकोप पाहावयास मिळत आहे. राज्य सरकारे चिंताग्रस्त आहेत आणि त्या जोडीला केंद्रही. यामध्ये डासांमुळे होणार्या आजारांचे थैमान हे आता नित्याचे झाले आहे. केंद्र सरकारने यावर्षी डेंग्यूच्या प्रकरणात वाढ झाल्याचे मान्य केले आहे. आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशात आतापर्यंत ३२ हजार ९१ जणांना डेंग्यू झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत याच काळाचे आकलन केल्यास हे प्रमाण अधिक आहे. वास्तविक डेग्यूंचे रुग्ण ऑक्टोबर महिन्यात आढळून येतात; मात्र यंदाचा ट्रेंड पाहिला, तर ३१ जुलैपर्यंत ही संख्या मागच्या वर्षीच्या तुलनेत ५० टक्के अधिक आढळून आली आहे. त्यामुळे आगामी काळात डेंग्यूचे रुग्ण वाढतील का, यावरून चिंता व्यक्त केली जात आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने 'नॅशनल सेंटर फॉर व्हेक्टर बोर्न डिसीस कंट्रोल'च्या आकड्यांचा संदर्भ देत म्हटले, जून महिन्यातच डेंग्यूचे रुग्ण वाढले असून त्यामुळे देशभरात ३२ पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला. सर्वाधिक २२ मृत्यू केरळ राज्यात झाले आहेत. कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातही डेंग्यूने बळी गेले आहेत. देशात डेंग्यूचा उद्रेक पाहता त्याचा आढावा घेणे आणि त्यावर लक्ष ठेवण्यास सुरुवात झाली आहे. या स्थितीचे आकलन करताना तयारी, तंत्रज्ञानाच्या आधारे मिळणार्या सूचनांकडे लक्ष दिले पाहिजे आणि त्यानुसार राज्याला सजग केले पाहिजे. रुग्णालयातदेखील रुग्णांची संख्या वाढली आहे. रुग्णालय डेंग्यूचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असून नागरिकांनीही खबरदारी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

स्वच्छता राखण्याबरोबरच तब्येतीची काळजीही घ्यावी लागणार आहे; परंतु आजारपणाचा फैलाव का होत आहे, हाही प्रश्न आहे. वास्तविक हवामान बदलाने जगातील आजारपणांची तीव्रता वाढविली आहे. आपण केवळ डेंग्यूचा विचार केला, तर तो जगातील अनेक देशांत पसरत आहे. त्या देशांनी डासांविरोधात मोठी मोहीम सुरू केली आहे. विशेष म्हणजे, स्पेनमधील एका प्रयोगशाळेत डेंग्यूचा आजार अणि अन्य आजारांचा मुकाबला करण्यासाठी टायगर डासांचे प्रजनन आणि निर्जंतुकीकरण केले जात आहे. हवामान बदलामुळे अनेक प्रकारचे डास युरोपात वाढले आहेत. भारतालाही अशा आजारांचा सामना करण्यासाठी व्यापक योजना आखून काम करावे लागणार आहे.

भारतात सध्या झिका विषाणूचा संसर्गही वाढला आहे. संसदेतील माहितीनुसार, सरकारने झिका व्हायरसला रोखण्यासाठी कार्य योजना हाती घेतली आहे आणि देशात २२ जुलैपर्यंत झिका व्हायरसग्रस्त रुग्णांची संख्या ५३७ वर पोहोचल्याचे सांगण्यात आले. या व्हायरसमुळे चिंता निर्माण होण्याचे कारण म्हणजे, त्याचा महाराष्ट्रात सर्वाधिक उद्रेक आहे. झिका हा डेंग्यू आणि चिकुनगुनियासारखाच डासांमुळे होणारा आजार आहे. एडिस डासांमुळे झिका आजार होता. हा आजार प्राणघातक नसला, तरी झिकाची लागण झालेल्या गर्भवतींना त्याचा अधिक धोका असतो. गर्भवतींना झिकाची लागण झाल्यास त्यांच्या गर्भात असलेल्या नवजात अर्भकाच्या मेंदूचा आकार लहान होऊ शकतो. यामुळे गर्भवतींना तपासणी करून सतत दक्ष राहण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. हा अजार अन्य राज्यांत पसरण्यापासून रोखण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. केंद्र सरकारकडून पावले उचलली जातील आणि त्याचबरोबर लोकांनीही जागरूक राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. बदलत्या हवामानात खानपानात सजगता आणि स्वच्छतेची काळजी घेणे गरजेचे आहे आणि हा जुना सल्ला नेहमीच लक्षात ठेवला पाहिजे.

# कीटकनाशक फवारणी टाळण्यासाठी तीन सोपे पर्याय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ अमरावती.** पिकांमध्ये किडींचा प्रादुर्भाव पिक पेरणी पासून ते काढणी पर्यंत दिसून येतो. पिक व्यवस्थापनात पिक संरक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. महागडी कीटकनाशके फवारली जातात. परंतु किडीची आर्थिक नुकसान पातळी ओळखून व्यवस्थापन केल्यास कीड व्यवस्थापनात चांगले परिणाम दिसून येतात.




कीटकनाशके फवारणी टाळण्यास आपण काही उपाययोजना करू शकतो त्यात पेरणी व काढणीची वेळ, वाणांची निवड, शिफारशीनुसार रासायनिक खतांचा वापर, आंतरपीक पध्दती, पिकांची फेरपालट, पाण्याची मात्रा यांचा समावेश आहे. त्याचबरोबर आपण सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळ्यांचा वापर कसा करायचा ते पाहूया.

१) सापळा पिक

मुख्य पिकांचे हानीकारक किडींपासुन संरक्षण करण्याच्या उददेशाने किडींना बळी पडणारे दुसरे पीक मुख्य पिकासोबत लावले जाते. सापळा पिकाची लागवड शेताच्या चारी बाजुंनी करतात. मुख्य पिकाच्या क्षेत्रानुसार सापळा पिकाची घनता ठरवावी.

– सापळा पिक हे मुख्य पिकाच्या जीवनकाळात सुरुवातीपासुन ते शेवटपर्यंत किडींना आकर्षित करणारे असावे.

– मुख्य पिकाशी अन्नद्रव्य, पाणी, जागा याला कमी स्पर्धा करणारे असावे.

– टप्याने सापळा पिकावरील किडींचे अंडीपुंज, आळया कोष आणि प्रौढ अवस्था गोळा करुन नष्ट कराव्यात. उदा. कापुस पिकात पिवळ्या रंगाचे झेंडु सापळा पिक हे हिरव्या बोंड अळी करीता (तसेच झेंडुमुळे सुत्रकृमी नियंत्रण होते)

२) पक्षी थांबे

हानिकारक किडींपासुन पिकांचे संरक्षण करण्यामध्ये पक्षांची महत्वाची भुमिका आहे. ९०% पक्षी मांसाहारी आहेत. सुमारे ३३% नियंत्रण पक्षांमार्फत होऊ शकते. शेतामध्ये मध्यापेक्षा बांधावर आणि झाडाच्या जवळ किडींचे प्रमाण कमी असते. पक्षांपासुन होणारा फायदा पाहता काही प्रसंगी पक्षांपासुन होणारे नुकसान गौण ठरते.

– कपाशी लागवड करताना बियासोबत मका व सुर्यफुलांचे दाने मिसळुन लावावेत.

– हरभरा किंवा कपाशी पिकांत सकाळी पक्षांना दिसेल अशा उंचीवर भात ठेवावा त्यामुळे पक्षी आकर्षित होतात.

– टीव्ही अँटेनाप्रमाणे शेतात काही ठिकाणी लाकडी पक्षी थांबे उभा केल्यास पक्षांना बसण्यास जागा उपलब्ध होते.

– पक्षांकरीता पाण्याची व घरटयांची सोय करावी जेणेकरुन पक्षी कायमचे शेतात थांबतात.

३) चिकट सापळ

कोणत्याही पिकामध्ये रससोशक किडी जसे मावा, तुडतुडे, फुलकिडे, ढालकिडे, नागअळी, पांढरी माशी इत्यादी पिकांच्या वाढीच्या अवस्थेत हल्ला करतात. त्यामुळे पिकांच्या वाढीचा वेग मंदावतो व यांनी केलेल्या घावातून बुरशीजन्य रोगांची लागन होते तसेच या किडींमुळे विषाणुजन्य रोगांचाही प्रसार होतो. त्यामुळे त्यावर पिवळे चिकट सापळे प्रभावी ठरतात.

– शक्यतो कोरुगेटेड शीट पासुन बनवलेले सापळे वापरावेत.

– विशिष्ठ पिवळ्या किंवा निळ्या रंगामुळे किड्यांना नवीन पालवी असल्याचा भास होतो व सापळ्याकडे आकर्षित होतात, एकदा सापळ्यावर बसली की चिकट द्रवामुळे किड अडकते व मरते.

– चिकट सापळ्यांची उंची पिकाच्या थोडी वर ठेवावी.

– किडींचा प्रकार व संख्येचे निरीक्षण करण्यासाठी एकरी ६ सापळे लावावीत.

– सापळ्यांचा माध्यमातुन किड नियंत्रण करायचे असल्यास एकरी १२ ते १८ सापळे वापरावेत. तर किड नियंत्रणाबाहेर जात असेल तर सापळ्यांची संख्या वाढवत जावी. जेव्हा सापळ्यांचा पृष्ठभाग किडींनी भरुन जाईल तेव्हा नवीन सापळे वापरात घ्यावेत.

# रस शोषक कीडी व गुलाबी बोंड अळीचे असे करा व्यवस्थापन

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक**

कापूस पिकावर सुरवातीच्या काळात प्रामुख्याने मावा, तुडतुडे आणि फुलकिडे या रसशोषक किडीचा प्रादूर्भाव आढळून येतो. कोरडवाहू कापूस पिकावर मावा या किडीचा प्रादूर्भाव जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून आढळून येतो तर तूडतुड्यांचा प्रादूर्भाव जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून व फुलकीड्यांचा ऑगस्टच्या पहिला आठवड्यापासून आढळून येतो. तर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव डोमकळ्याच्या स्वरूपात ऑगस्ट महिन्यात दिसुन येतो. वरील सर्व प्रकारच्या किडीमुळे कपाशी पिकाचे नुकसान होऊ शकते. सुरुवातीपासुनच या किडींचे व्यवस्थापन केल्यास हे नुकसान बऱ्याच प्रमाणात कमी करता येते. त्यासाठी खालील उपाययोजनाचा अवलंब करावा.



**एकात्मिक व्यवस्थापन:**
**रस शोषक कीडींचे व्यवस्थापन**

बीटी कपाशीच्या बियाण्याला इमिडाक्लोप्रीड किंवा थायमिथोक्झाम किटकनाशकांची बीजप्रक्रीया केलेली असते. त्यामुळे रस शोषक किडींपासून सर्वसाधारण २ ते ३ आठवड्यापर्यंत पिकाला संरक्षण मिळते म्हणून या काळात किटकनाशकांची फवारणी करू नये.

वेळोवेळी प्रादूर्भावग्रस्त फांद्या, पाने व इतर पालापाचोळा जमा करून किडींसहीत नष्ट करावा.

पिकामधे उगवणीनंतर आठ ते दहा दिवसानंतर २५ पिवळे चिकट सापळे प्रती हेक्टर लावून नियमित पांढरी माशीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवावे.

कपाशीत चवळीचे आंतर पीक घ्यावे त्यामुळे चवळी पीकावर कपाशीवरील किडींच्या नैसर्गिक शत्रू किटकांचे पोषण होईल.

वेळेवर आंतरमशागत करून पीक तणविरहीत ठेवावे त्यामुळे किडींच्या पर्यायी खाद्य तणांचा नाश होईल. तसेच बांधावरील किडींच्या पर्यायी खाद्य तणे जसे अंबाडी, रानभेंडी इ. नष्ट करावी.

मृद परीक्षणाच्या आधारावर खतमात्रेचा अवलंब करावा आणि जास्तीचा नत्र खताचा वापर टाळावा जेणेकरून कपाशीची अनावश्यक कायीक वाढ होणार नाही आणि पीक दाटणार नाही पर्यायाने अशा पीकावर किडही कमी प्रमाणात राहील.

रस शोषक किडीवर उपजीविका करणारे नैसर्गिक किटक उदा. सीरफीड माशी, कातीन, ढालकिडे, क्रायसोपा इत्यादी परोपजीवी किटकांची संख्या पूरेशी आढळून आल्यास रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळावा.

**रस शोषक किडींसाठी कपाशी पिकाचे प्रादूर्भावाबाबत सर्वेक्षण करावे.**

सरासरी संख्या १० मावा/पान किंवा २ ते ३ तूडतूडे/पान किंवा दहा फूलकीडे/पान किंवा मावा, तुडतुडे आणि फुलकिडे यांची एकत्रित सरासरी संख्या दहा/पान किंवा त्यापेक्षा जास्त आढळून आल्यास नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशकाचा वापर करावा. त्यासाठी बुप्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली., किंवा फिप्रोनील ५ टक्के प्रवाही ३० मि.ली., किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के २.५ मि.ली. यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन**

पिक उगवणीनंतर ४० ते ४५ दिवसांनतर फेरोमेन (कामगंध) सापळ्यांचा वापर करावा. सापळे पिकापेक्षा किमान एक फुट उंचीवर लावावेत, जेणेकरून फेरोमेन (कामगंध) सापळ्यांचा प्रभाव वातावरणात पसरण्यास मदत होईल. यासाठी एकरी दोन किंवा हेक्टरी पाच फेरोमेन (कामगंध) सापळे लावावेत. सतत तीन दिवस या सापळ्यामधे आठ ते दहा पतंग आढळल्यास गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनाचे उपाय योजावेत तसेच मास ट्रॅपिंग करीता हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावावेत.

प्रत्येक कापूस संकलन केंद्रावर व जीनींग फॅक्टरीमध्ये १५ ते २० कामगंध सापळे लावून दर आठवड्याने पतंगाचा नायनाट करावा.

पिकातील डोमकळ्या नियमित शोधून त्या अळी सहीत नष्ट कराव्या म्हणजे पुढील पिढ्यांची रोकथाम करता येईल

पिक उगवणी नंतर ३५ ते ४० दिवसांपासुन दर पंधरा दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ॲझॅडिरेक्टिन ३००० पीपीएम ४० मिली प्रति १० ली पाणी या प्रमाणे फवारणी.

पिक उगवणी नंतर ५५ ते ६० दिवसांनी १२ ते १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोग्रामा टॉयडीयाबॅक्ट्री किंवा ट्रायकोग्रामा चिलोनिस परोपजीवी मित्र किटकांची कार्ड (१.५ लक्ष अंडी प्रति हेक्टरी) चार वेळा पिकावर लावावेत.

गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक आठवड्याला एकरी शेताचे प्रतिनिधित्व करतील अशी २० झाडे निवडून निवडलेल्या प्रत्येक झाडावरील फुले, पात्या व बोंडे संख्या मोजून त्यात गुलाबी बोंड अळीग्रस्त फुले, पात्या व बोंडे यांची टक्केवारी काढावी व प्रादुर्भावग्रस्ताची टक्केवारी ५ टक्के पेक्षा जास्त आढळल्यास खाली दिल्याप्रमाणे रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी.

प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही ३० मिली किंवा क्लोरॅट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ३ मिली किंवा थायोडिकार्ब ७५ टक्के भुकटी २० ग्रॅम किंवा फिप्रोनील ५ टक्के एससी ३० मिली किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी १२ मिली या पैकी कोणत्याही एका किटकनाशकची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी

**(माहिती संकलन : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)**




# कांजिण्या संसर्गजन्य आजार; बचाव आणि उपाय

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक**

व्हेरिसेला या नावाने ओळखला जाणारा कांजिण्या हा एक विषाणू असून तो लहान मुलांवर हल्ला करतो. यामुळे शरीरावर सर्वत्र खाज सुटणारे, लाल पुरळ उठतात. कांजिण्या हा एक संसर्गजन्य आजार असून रुग्णाच्या संपर्कात येणार्या व्यक्तीला तो होऊ शकतो. त्याच्यावर लसीकरण हा उत्तम उपाय आहे.

मुलांना कांजिण्या येणे हा एक सामान्य आजार आहे. यामध्ये दोन-तीन दिवस किरकोळ ताप आल्यानंतर मसुराइतके बारीक फोड येतात. सुरुवातीला छाती, पोट, पाठीवर हे फोड येतात. नंतर ते चेहरा आणि हाता-पायांवरही दिसू लागतात. हळूहळू या फोडांमध्ये पाणी होऊ लागते आणि ते फुटून सुकू लागतात. त्यावर पापुद्रे धरतात आणि हळूहळू ते निघून जातात आणि त्याठिकाणी हलकासा डाग राहतो. नवीन फोड दोन-तीन दिवसांपर्यंत येतात. छोट्या मुलांमध्ये काही फोडच येतात. पण, मोठ्या माणसांमध्ये जास्त फोड येतात आणि आजार गंभीर रूप धारण करतो.

कांजिण्या हा एक संसर्गजन्य आजार आहे. रुग्णाचा खोकला आणि त्याच्या फोडांमुळे या आजाराचे संक्रमण वाढते. रुग्णाच्या संपर्कात येणार्या लोकांना १४ दिवसांमध्ये कांजिण्या होतात. शरीर कांजिण्यांच्या विरोधात प्रतिरोधक शक्ती बनवून या आजारातून सुटका करते. एकदा अशा प्रकारचा आजार झाल्यानंतर त्याला प्रतिकार करण्याची शक्ती आयुष्यभर राहते. त्यामुळेच हा आजार दुसर्यांदा होत नाही.

लहानपणीच कांजिण्या आल्या असतील तर त्यानंतर त्याचा धोका शक्यतो नसतो. लहानपणी हा आजार झाला नसेल, तर वयाच्या १० व्या वर्षानंतर हा आजार होऊ शकतो.

पूर्वी देवी हा एक धोकादायक आजार होता आणि त्याचे डाग आयुष्यभर राहत असत. प्रभावी लसीकरणामुळे हा आजार संपुष्टात आला आहे. कांजिण्या हा मुलांचा सामान्य आजार आहे आणि त्यामुळे जीवाला धोका नसतो. त्यासाठी त्याचे लसीकरण



अत्यावश्यक नाही.वयाच्या १५ महिन्यांनंतर केव्हाही लसीकरण करता येते. लसीकरणामुळे पूर्णपणे सुरक्षा मिळते. पण, कधीकधी लसीकरणानंतरही कांजिण्या होऊ शकतात. संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात राहिल्यामुळे अशा प्रकारचा आजार होऊ शकतो. जे लोक दाट लोकवस्तीमध्ये राहतात त्यांना अशा प्रकारची समस्या भेडसावते.

लसीकरणानंतर ही समस्या उद्धवल्यास शरीरावर कमी फोड येतात आणि आजार वाढत नाही. यापासून बचाव करण्यासाठी कमिटी ऑफ इम्युनायझेशनने कांजिण्यांचे दुसरे लसीकरण पाच वर्षांच्या वयामध्ये करून घेण्याचा सल्ला दिला आहे.


खरे पाहता, १९९० च्या मध्यात कांजिण्यांची लस विकसित झाल्यापासून रुग्णांची संख्या कमी झाली आहे. कारण, या लसीमुळे ९० टक्के बालकांचं कांजिण्यांपासून रक्षण केलं जातं. यासाठी बाळाच्या १२ ते १५ महिने वयादरम्यान लस देणं गरजेचं आहे. दुसरा प्रायमरी डोस बालकाच्या ४ ते ६ वर्षे वयामध्ये दिला जातो. ज्या बालकांना व प्रौढांना लस मिळाली नाही वा कांजिण्या होऊन गेल्या आहेत, त्यांना कॅच-अप डोस घेता येतो. वयस्कर रुग्णांमध्ये कांजिण्या अधिक तीव्र होत जातात. ज्या पालकांनी आधी लस घेतलेली नाही, त्यांना नंतर घेता येते.

# बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराचे अकोल्यात पडसाद; हिंदुत्ववादी संघटना रस्त्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अकोला-** हिंदू राष्ट्र समन्वय समिती आणि समविचारी हिंदू संघटनांच्यावतीने बांगलादेशातील हिंदुवरील अत्याचाराच्या विरोधात सोमवारी आंदोलन करण्यात आले. निषेध करण्यासाठी विविध हिंदुत्ववादी संघटना रस्त्यावर उतरल्या होत्या. बांगलादेशातील अत्याचाराचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

बांगलादेशातील हिंदुंवर होत असलेल्या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी विविध हिंदुत्ववादी संघटनांचे प्रतिनिधी सोमवारी सायंकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्रित जमले. यावेळी हिंदुवरील अत्याचाराच्याविरोधात नारेबाजी करण्यात आली. बांगलादेशात गेल्या काही दिवसांपासून आरक्षणाच्या विरोधात चालू असलेल्या आंदोलनाने प्रचंड हिंसक वळण घेतले. शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा




राष्ट्रपतींकडे सोपवून देशातून पलायन केले. बांगलादेशातील आरक्षणाच्या सूत्रावरून प्रारंभ झालेल्या हिंसाचाराने आता टोक गाठले आहे. या हिंसाचाराचे रुपांतर आता अराजकतेत झाले. सरकारविरोधी आंदोलन हे आता हिंदुंच्या विरोधात प्रारंभ झाले आहे. बांगलादेशात २७ ठिकाणी हिंदुंना लक्ष्य करण्यात आले. जाणीवपूर्वक हिंदुंना लक्ष्य करून त्यांच्या उघडपणे हत्या करणे, हिंदुंच्या घरांवर आक्रमणे करणे, हिंदुंची दुकाने लुटणे, हिंदुंच्या मंदिरांची तोडफोड करणे, आग लावणे, हिंदू महिलांवर अत्याचार करणे, हिंदुंना विस्थापित करणे आदी प्रकार सुरू झाले. हिंदू नगरसेवक, पत्रकाराचीही हत्या झाली. या गोष्टींमुळे तेथील अल्पसंख्यांक हिंदुंमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे, असे हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे उदय महा यांनी सांगितले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १३ ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण


## राज्यातील निवासी डॉक्टरांचे आजपासून कामबंद आंदोलन

### कोलकात्यातील घटनेचा निषेध, फक्त अत्यावश्यक सेवा सुरु राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती –**
कोलकाता येथील सरकारी रुग्णालयात निवासी डॉक्टरची बलात्कार करून हत्या केल्याची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण देश हादरला आहे. या घटनेच्या निषेधार्थ राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील निवासी डॉक्टर आज, मंगळवारपासून कोणतेही नियमित काम करणार नसल्याचे महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड) संघटनेने निवेदनाद्वारे कळविले आहे. या काळात 'अत्यावश्यक सेवा' मात्र सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या निर्णयामुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

फेडरेशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स असोसिएशन इंडिया (फोरडा) या राष्ट्रीय पातळीवरील निवासी डॉक्टरांच्या संघटनेनेसुद्धा सर्व निवासी डॉक्टरांना निवडक सेवा बंद करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील निवासी डॉक्टर संघटनेने आणि राज्यातील सरकारी वैद्यकीय



महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांत काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांनी त्यांचा निर्णय जाहीर केला. हे 'काम बंद आंदोलन' मागण्या पूर्ण होईपर्यंत असून अनिश्चित कालावधीसाठी असल्याचे सांगण्यात येत आहे. वैद्यकीय वर्तुळात कोलकाता येथील घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला जात आहे.शासकीय रुग्णालयात निवासी डॉक्टर हा त्या ठिकाणच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा आहे. त्यांच्याशिवाय रुग्णालयाचे कामकाज सुरळीतपणे चालूच शकत नाही, याची कल्पना सरकारला आणि प्रशासनाला व्यवस्थित आहे तरीही त्यांच्या अनेक मागण्या पूर्ण करण्यासाठी त्यांना आंदोलन करावे लागत असते. ज्या ठिकाणी निवासी डॉक्टर काम करतात त्या ठिकाणचे काम बंद असल्याने याचा रुग्णांना मोठा फटका बसू शकतो. वरिष्ठ डॉक्टरने दिलेल्या माहितीनुसार, या निवासी डॉक्टरांच्या काम बंद आंदोलनामुळे अनेक नियोजित शस्त्रकिया रद्द कराव्या लागण्याची शक्यता आहे तसेच नियोजित शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना दाखल करून घेतले जाणार नाही. तसेच काही रुग्णांना तातडीच्या वैद्यकीय सेवेची आवश्यकता नसेल अशा रुग्णांना डिस्चार्ज दिला जात आहे तसेच सर्व अध्यापक वर्गाला बाह्यरुग्ण विभाग आणि रुग्ण दाखल असलेल्या रुग्णांची काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## आधी बोलले १५०० रुपये काढून घेऊ, नंतर म्हणाले गंमतीने बोललो

### टीकेची झोड उठल्यानंतर रवी राणांची सारवासारव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती–**
आशीर्वाद दिला नाही, तर तुमच्या खात्यातून पेसे परत घेऊ, असं विधान केल्यानंतर टीकेच्या धनी बनलेल्या रवी राणा आता आपल्या विधानाची सावरासावर करताहेत. बहीण भावाच्या नात्यांमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात मी गमतीने ते बोललो आणि सगळ्या महिला तेव्हा हसत होत्या, असं म्हणत रवी राणा यांनी आपल्या विधानाचं सारवासावर केली.



अमरावतीत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचं प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडला. या सोहळ्याला आमदार रवी राणा यांनीही हजेरी लावली. याच सोहळ्यात त्यांनी लाडक्या बहिणींना दम दिला होता. आगामी विधानसभा निवडवणुकीत मतदानाचा आशीर्वाद मिळाला नाहीतर तुमच्या खात्यातून १५०० रुपये काढून घेऊ असं विधान आमदार रवी राणा यांनी केलं होतं.

त्यांच्या विधानानंतर विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. टीकेचे धन बनताच त्यांनी आपल्या विधानाची सारवासावर केली. बहीण भावाच्या नात्यांमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात मी गमतीने ते बोललो आणि सगळ्या महिला तेव्हा हसत होत्या. बहीण भावाचं नातं हे गमतीच आपुलकीचं, प्रेमच, असलं पाहिजे, आणि त्या नात्यांमध्ये मी बोललो मात्र विरोधक त्याचा बाऊ करत आहे. त्यांच्या पायाखालची वाळू घसरल्याची टीका त्यांनी यावेळी केली. येणाऱ्या काळामध्ये सरकार आल्यावर १५०० रुपयाचा हप्ता ३००० रुपये महिना करण्याची मागाणी सुद्धा मी केलीय. आशा वर्कर मदतनिस चा पगार वाढावा ही सुद्धा मी मागणी केली आहे.

## स्वातंत्र्यदिनी जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव

### पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**
कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा(आत्मा) व प्रेमकिशोर सिकची, चॅरीटेबल ट्रस्ट, वलगाव यांचे संयुक्त विद्यमाने रानभाजी महोत्सव गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सिकची रिसोर्ट, वलगाव येथे आयोजीत करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्धाटन उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य तथा जिल्हाचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते होणार आहे. रानभाज्यांचे महत्व प्रसारित करणे व विपणन साखळी निर्माण करण्याकरिता सन २०२०-२१ पासून दरवर्षी रानभाजी महोत्सव आयोजीत करण्यात येते. त्यानुसार यावर्षी महोत्सव क्रांती दिनाचे निमित्याने सप्ताह स्वरूपात दि. ९ ते १५ ऑगष्ट २०२४ या कालावधीत साजरा करण्याबाबत सूचना प्राप्त आहेत. शेतशिवारातील नैसर्गिक रित्या उगवणाऱ्या रानभाज्यांचे आरोग्य विषयक महत्व जास्तीत जास्त लोकांना माहिती होण्यासाठी तसेच रानभाज्यांची विक्री व्यवस्थेमधून शेतकऱ्यांनाही आर्थिक फायदा



करुन देणे या मागचा प्रमुख उद्देश आहे.दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत सिकची रिसोर्ट, वलगाव येथे आयोजीत जिल्हास्तरीय महोत्सवामध्ये आत्मामार्फत स्थापित शेतकरी गटाचे रानभाज्या तसेच भरडधान्य विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहे. या जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचा लाभ रानभाजी उत्पादक, विक्रेते शेतकरी व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केलेले आहे.

## माधान येथील नाला गाळाचा ५ लक्ष मलिदा कोणी खाल्ला ?

### १४ तारखेला ग्रामपंचायत माधान मध्ये चौकशीचे होणार सादरीकरण

#### माधान नाला गाळ खोलीकरणाची पंचायत समिती माध्यमातून पूर्तता न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय माध्यमातून होणार चौकशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ चांदुर बाजार**
रोजगार हमी योजना माध्यमातून माधान येथे शासन स्तरावर ५ लक्ष निधी मजून करून देण्यात आला मात्र या नाला गाळ खोलीकरण झाले नसल्याने चुकीच्या पद्धतीने ४ लक्ष ६३ हजार आठशे २७ रु काढण्यात आले असून या मध्ये या मध्ये १६९९ मजूर दाखवण्यात आले असून पूर्ण पैशे काढून शासनाच्या तिजोरीवर गल्ला मारल्याची चित्र सध्या माधान येथे निदर्शनात आलेले आहे .

नाल्यातील पाणी असताना नाला गाळ कोणत्या पध्दतीने काढला असावा?, नाला गाळ काढला तर हिरवे गार झाले कशे काय? नाला गाळ काढलेली माती कुठे असावी? असे अनेक प्रश्न या मध्ये उपस्थित झाले आहे या मध्ये शाळकरी विद्यार्थी, अपंग बांधव, श्रावण बाळ पात्र पायाने आणि हाताने अपंग असणारे अर्धांगवायू आजारी असणारे सुद्धा, व खाजगी कामावर गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले नागरीक या मध्ये टाकून हजेरी मस्टर मध्ये गाळ काढण्यात






आलेले दाखवले आहे या गोष्टी ची दखल अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे शहर अध्यक्ष व रुग्णसेवक सुयोग भागवतराव गोरले यांनी मुख्यमंत्री यांना ऑनलाईन द्वारे व पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, तहसीलदार, गटविकास अधिकारी पंचायत समिती चांदुर बाजार यांना निवेदन देऊन पुरावे सादरीकरण केले आहे माधान येथील नाल्यातील गाळ काढण्य करिता रोजगार सेवकाणे हजेरी रजिस्टर मध्ये बोगस नावे भरून हजेरी बुक भरले आहे त्या हजेरी मस्टर बुक पंचायत सानिती चांदूर बाजार येथील तांत्रिक इंजीनियार यांनी डोळे मिटून सह्या करून लाखो रुपयाचा शासणाच्या रकमेला चुना लावला आहे वास्तविक पाहता हजेरी बुकमध्ये शाळकरी विध्यार्थी, अपंग, श्रावण बाळास पात्र पायाने आणि हाताने अपंग असणारे व अर्धांगवायुने आजारी असणारे सुद्धा या हजेरी बुकमध्ये सामाविष्ट आहे.

या हजेरी बुकमध्ये काही मजुर गाळ कळण्या करिता दाखीवले आहे व तेच मंजूर ताल्लुक्याच्या ठिकाणी काम सुद्धा करत आहे या भोंगळ कामाचा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चौकशी व्हावी या करिता रुग्णसेवक पत्रकार सुयोग गोरले यांनी रक्तदान करून भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाराविरुद्ध तीव्र निषेध करत निवेदन सादरीकरण केले आहे या करिता १४ तारीख ला पंचायत समिती माध्यमातून चांदूर बाजार तालुका मार्फत चौकशी सुद्धा लावण्यात आली आहे मात्र सुयोग गोरले यांचा विश्वास नसल्याने तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी चौकशीस आल्यास ते वरील भ्रष्टाचार्यांना वाचवण्याचा अथक प्रयत्न करतील करिता या करिता जिल्हा स्तरावर चौकशी होऊन माधान गावातील मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराची देवाणघेवाण झालेली असताना या सर्वांना दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे शहर अध्यक्ष पत्रकार रुग्णसेवक सुयोग गोरले यांनी निवेदन देऊन केली आहे

## राखी पौर्णिमेच्या रात्री 'सुपरमून'ची झळाळी

### अंतर कमी असल्याने चंद्र दिसणार नेहमीपेक्षा मोठा व प्रकाशमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**
या वेळी १९ ऑगस्टला राखी पौर्णिमा आहे. या दिवशी पृथ्वीपासून सूर्याचे अंतर ३,६१,९६९ किमी राहणार आहे. अंतर कमी असल्याने या दिवशी रात्री आकाशात उगवणारा पौर्णिमेचा चंद्र नेहमीपेक्षा मोठा व प्रकाशमान राहणार आहे. याला सुपरमून म्हणतात.

पृथ्वीपासून चंद्राचे सरासरी अंतर हे नेहमी ३.८५ लाख किमी असते, हे अंतर नेहमी कमी-जास्त होत असते, सुपरमूनच्या दिवशी चंद्र पृथ्वीच्या जवळ आल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीची तीव्रता वाढणे, वादळ यांसारख्या घटना घडू शकतात. चंद्राची परिवलन व परिचलन



या गती सारख्याच असल्याने पृथ्वीवरून आपण चंद्राचा ५९ टक्केच भाग पाहू शकतो, तर चंद्रावरून पृथ्वी ही ९८.४ टक्के दिसते.

खगोलप्रेमी व जिज्ञासूंनी १९ ऑगस्टच्या संध्याकाळी दिसणारा सुपरमून अवश्य पाहावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे प्रवीण गुल्हाणे व हौसी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

#### चंद्राचे वय ४.६५ अब्ज वर्ष

चंद्राचे वय हे ४.६५ अब्ज वर्ष आहे. चंद्र हा पृथ्वीपासून दरवर्षाला ३.८ सेमी. लांब जात आहे. त्यामुळे पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी होईल. व १०० वर्षांनी हा दिवस दोन मिलीसेकंदने मोठा होईल.

चंद्रावर ३० हजार विवरे व २१ पर्वत आहे. पर्वत व विवरे टेलिस्कोपमधून पाहता येतात. यानंतर १८ सप्टेंबर व १७ ऑक्टोबर आणि १५ नोव्हेंबर २०२४ ला सुपरमूनचे मनोहारी दर्शन घडेल.

## पीक विमा कंपनीने चालवली शेतकऱ्यांची थट्टा

### एक महिना रिप रिप पाऊस होऊनही पिकांचे दाखविले ५% नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नांदगांव खंडेश्वर**
तालुक्यात महिना भरापासून सततचा रिप रिप पाऊस ढगाळ वातावरण व सूर्यप्रकाशाचा अभावाने खरिपाच्या पिकांची वाढ खुंटली व पिके पिवळी पडली आहे अश्यात पीक विमा कंपनीने सर्वेक्षणात फक्त ५% ते १०% पिकाचे नुकसान दाखऊन शेतकऱ्यांची थट्टा चालविली असून विमा कंपनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत असल्याचा आरोप शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी केला असून शेतकऱ्यांना विमा कंपनी कडून न्याय न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा सुद्धा दिला तालुक्यात जुलै महिन्या पासून पावसाची रिप रिप सुरू आहे सततच्या पावसामुळे फवारणी डवरणी निंदन न चालल्यामुळे पिकापेक्षा तण जास्त वाढले आहे अशात शेतात पाणीच पाणी साचल्याने तूर कपाशीचे व सोयाबीन पिके पिवळी पडून काही शेतातील पिके जास्त पावसाने सुखली आहे शेतकऱ्यांनि विमा कंपनीकडे तक्रारी केल्या विमा कंपनीचे प्रतिनिधी सर्वेक्षणात ५%, १०% नुकसान दाखवत आहे त्यामुळे शेतकऱ्यांनमध्ये विमा कंपनी बद्दल प्रचंड रोष वाढला आहे तेव्हा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनि तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रारी करून पुनर सर्वेक्षण करण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला यावेळी प्रफुल धाये निलेश हिरोडे पवन हिरोडे अमोल लळे वैभव धाये राहुल माहुलकर गोपाल हिरोडे अश्विन लोणकर आकाश हिरोडे इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

#### शेतकऱ्यांनमध्ये पीक विमा कंपनी बद्दल रोष

सतत एक महिना पाऊस पडल्याने पिकांची वाढ खुंटली तसेच पिके सुध्दा पिवळी पडल्याने सोयाबीन पिकाचे उत्पादन घटले आहे त्यात विमा कंपनी सर्वेक्षणात ५% नुकसान दाखवत आमच्या जखमेवर मिठ चोळत आहे तरी पुन्हा सर्वेक्षण करण्यात यावे✻निलेश हिरोडेशेतकरी वाटपुर



रिप रिप पावसाने फवारणी झाली नाही त्यामुळे अति पावसामुळे कपाशी तूर सुकून जात आहे त्यामुळे प्रचंड नुकसान झाले असतांना विमा कंपनी फक्त १०% नुकसान दाखवत आहे हा एक प्रकारचा अन्याय आहे

**– मधुकर हिरोडेशेतकरी वाटपुर–**

# मतदार यादीत आपले नाव आजच तपासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२. अमरावती–** राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात सुरु केलेला यावर्षीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम हा २० ऑगस्ट २०२४ (मंगळवार) पर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमांतर्गत पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलांमध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधी उपलब्ध आहे. यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदारांनी आपले नाव मतदार यादीत आहे की नाही हे तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**मतदान यादीत नाव तपासणे का गरजेचे आहे?**

अनेकदा असं दिसतं की नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पोहचल्यावर मतदार यादीत आपले नाव शोधतात. अशावेळी त्यांचे नाव मतदान यादीत न आढळल्यास ते मताधिकाराला मुकतात.

बऱ्याचदा मतदार त्यांनी आधीच्या निवडणुकीत ज्या मतदान केंद्रावर मत दिले होते, तिथेच आपले नाव असेल असे गृहीत धरून त्याच मतदान





केंद्रावर जातात. मात्र मतदार केंद्रांच्या पुनर्रचनेत त्यांचे नाव दुसऱ्या मतदान केंद्रावर गेलेले असू शकते. या माहितीच्या अभावामुळेही मतदार यादीत आपले नाव नाही असे समजून ते मतदानाला मुकतात.

मतदार ओळखपत्रात नाव, लिंग, जन्मतारीख, मोबाइल क्रमांक इ. वैयक्तिक तपशिलात चुका असतील तर, मतदाराला असे ओळखपत्र एखाद्या ठिकाणी पुरावा म्हणून देण्यास अडचण येऊ शकते, म्हणून त्यांनी हे बदल करून घेतले पाहिजेत. दुसरे महत्त्वाचे म्हणजे मतदानाच्या वेळीही ओळख पटवण्यासाठी ते अडचणीचे ठरू शकते. त्यामुळेही हे बदल करून घेणे आवश्यक आहे.

या सगळ्यासाठी आपण वेळोवेळी मतदार यादीत आपले नाव तपासले पाहिजे. जेणेकरून मतदार यादीत आपले नाव नसेल तर आपण मतदार नोंदणीचा अर्ज भरू शकतो, तसेच आपल्या वैयक्तिक तपशिलात– पत्त्यात बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करायची गरज असेल तर त्यासाठीचे अर्जही वेळेत भरू शकतो. यामुळे आपण ऐन मतदानाच्या दिवशी होणारा गोंधळ आणि विलंब टाळू शकतो.

**मतदान यादीत नाव कसे तपासावे?**

ऑनलाईन पद्धतीने आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने आपल्याला मतदार यादीत आपले नाव शोधता येते.

ऑनलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव तपासण्यासाठी दोन पर्याय आहेत. एक electoralsearch.eci.gov.in हे संकेतस्थळ आणि दुसरा teter Helpline App.

आपल्याला, आपले वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्र क्रमांक, मतदार ओळखपत्रासोबत जोडलेला युनिक मोबाइल नंबर, मतदार ओळखपत्रावरील बारकोड किंवा क्युआर कोड या माहितीच्या आधारे मतदार यादीत आपले नाव शोधता येते.

Voter Helpline App च्या होम पेजवरील Search Your Name In Electoral Roll हा पर्याय निवडला की, वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्रावरील बारकोड किंवा क्युआर कोड आणि मतदार ओळखपत्र क्रमांक या माहितीच्या आधारे मतदार यादीत आपले नाव शोधण्याचे पर्याय दिसतात.

electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळावर वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्र क्रमांक आणि मतदार यादीतील आपल्या नावासोबत जोडलेला युनिक मोबाइल क्रमांक या माहितीच्या आधारे मतदार यादीत आपले नाव शोधण्याचे पर्याय दिसतात.

आपण एसएमएसद्वारे देखील मतदार यादीत आपले नाव तपासू शकतो. त्यासाठी आपल्या मोबाइलवरून 'ECI ₹स्पेस ₹मतदान ओळखपत्र क्र. हा मेसेज १९५० या क्रमांकावर पाठवावा लागतो.

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही पीडीएफ स्वरुपातील मतदार यादी उपलब्ध असते. आपल्या मतदारसंघातील यादी भागानुसार ही मतदार यादी डाऊनलोड करून आपण त्यात आपले नाव तपासू शकता.


यासोबतच आपण जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन, तिथे उपलब्ध असलेल्या मतदारयादीच्या प्रतीतही आपण आपले नाव तपासू शकतो. तेव्हा, त्वरित आपले नाव तपासा आणि आपला मताधिकार सुनिश्चित करा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

# आठ दिवसांवर रक्षाबंधन

## बाजारपेठेत विविध प्रकारच्या आकर्षक राख्यांसह देव राखी विक्रीला

### यंदा २० टक्यानी महाग, मागील काही वर्षात ऑनलाईन खरेदीला पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती** – नऊ दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनानिमित्त शहरातील बाजारपेठेत आकर्षक राख्या विक्रीस दाखल झाल्या आहेत. महिलांना या राख्या भुरळ घालत आहे. बहिण– भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला सण रक्षाबंधन सोमवार (दि.१९ ) साजरा होणार आहे. यंदा महागाईमुळे दरांमध्ये सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच



मागील काही वर्षात ऑनलाईन राख्या खरेदीला प्राधान्य देण्यात येत, असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. बाजारपेठेत विविध प्रकारच्या आकर्षक राख्यासह पारंपारिक गोंडा राखी (देव राखी) बाजारात विक्रीस दाखल झाली आहे. महिलांकडून राख्यांच्या दुकानात खरेदीसाठी गर्दी होत आहे. शहराच्या विविध भागांमध्ये लहान, मोठ्या राखी विक्रीचे दुकाने सजल्याचे दिसत आहे. परदेश तसेच शहराबाहेर कामानिमित्त असलेल्या भाऊरावांना वेळेत राखी पोचण्यासाठी एक महिन्यापासूनच राखी खरेदी करण्याकडे महिलांचा कल वाढला. दुसरीकडे व्यवसायिकांमध्ये ही उत्साहाचे वातावरण आहे. तीन वर्षांपूर्वी कोरोनापासून राखी विक्री व्यवसायावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला होता. आता परिस्थिती सुधारली आहे. मात्र, या कालावधीत ऑनलाईन खरेदसाठी नागरीक पसंती देत आहेत. किरकोळ विक्रेते आणि सामान्य नागरिकांकडून खरेदीसाठी गर्दी केली जात आहे. सुमारे ५० टक्क्याने ग्राहक वाढले, असेल तरी अनेक नागरीक ऑनलाईन राख्या खरेदी करत असल्याची माहिती व्यवसायिक गजानन आप्पा आणि जगदीश आप्पा यांनी दिली. कुंदन वर्क आणि साध्या राख्यांना जास्त मागणी आहे. चिमुकल्यांसाठी लायटिंग राख्या, छोटा भीम, डोरेमॉन, मोटू पतलू, श्री गणेशा, श्रीकृष्ण अशा राख्या बाजारात विक्रीस आहे. लायटिंग, लाकडी, पपेट, कडा राखीसह पारंपारिक देव राखी अशा विविध प्रकारच्या राख्या बाजारात विक्रीस आले आहे.

**राखींमधील नावीन्यता**

यावर्षीही लायटिंग राखीमध्ये स्पिनर लायटिंग राखी आणि कपल राखी अर्थात महिला पुरुष दोघांसाठीही असलेली राख्या बाजारात आल्या आहेत. स्पिनर राखीस असलेले बटन दाबले की विविध रंगीत लायटिंग राखीची आकर्षकता वाढवते. तर कपल राखीमध्ये दोन राख्यांपैकी महिलांना सिंगल दोऱ्याची अर्थात बांगड्यांना बांधता येईल अशी लट राखी आणि तशीच बनावट असलेली डबल दोऱ्याची पुरुषांसाठी राखी नावीन्य आहे.

**राखींचे प्रकार दर रुपयात**

| | |
|---|---|
| साधी आणि स्पिनर लायटिंग– | ४० ते ६५ |
| उडन (लाकडी) | ३० ते ४० |
| कुंदन वर्क | २० ते ११० |
| मोती | १० ते ५० |
| जरदोशिवर | ३० ते ३५ |
| चिडा, लुब्बा | २२ ते ५० |
| कपल राखी | ४० ते ५० |
| पपेट | ५० ते ६० |
| कडा | १६५ |
| देवराखी एक डझन | ०५ |
| चांदी पॉलिश राखी | १२ ते १०० |

# 'महसूल पंधरवडा' निमित्त आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिकांचे सादरीकरण

## नैसर्गिक आपत्तीत बचाव, प्रथमोपचार व सीपीआरचे दिले प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** ऑगस्टपासून राज्यात सर्वत्र 'महसूल पंधरवडा' साजरा केला जात आहे. 'महसूल पंधरवडा'निमित्त आज विभागीय आयुक्त कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाव्दारे नैसर्गिक आपत्तीप्रसंगी बचाव व प्राथमिक उपचार याबाबत प्रात्यक्षिकाच्या सादरीकरणातून प्रशिक्षण देण्यात आले.

महसूल उपायुक्त संजय पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तसेच सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, अधीक्षक अभियंता पल्लवी सोनोने प्रमुख अतिथी म्हणून आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. पुंड, जिल्हा परिषदेचे दिव्यांग कल्याण अधिकारी पुरुषोत्तम शिंदे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर व चमू, विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक अमरजीत चौरपगार यावेळी उपस्थित होते. जिल्हा शोध व बचाव पथकाचे सदस्य गजानन वाडेकर यांनी नैसर्गिक



आपत्तीच्या प्रसंगी बाधितांचे प्राण वाचविण्यासाठी प्रथमोपचार कसा करावयाचा, हार्ट अटॅक किंवा कार्डियॅक अरेस्ट आल्यावर कशा पध्दतीने सीपीआर द्यावा, याबाबतचे प्रात्यक्षिकाच्या सादरीकरणातून प्रशिक्षण दिले. कार्डियॅक अरेस्ट आल्यावर पहिल्या पाच ते सहा मिनीटांत संबंधित व्यक्तीला प्रथमोपचार (सीपीआर) मिळाला तर एखादा व्यक्तीचे प्राण वाचू शकते. नैसर्गिक आपत्ती प्रसंगी पूर परिस्थितीत आपला व इतरांचा जीव कसा वाचवावा यासंबंधी जिल्हा शोध व बचाव पथकाचे सदस्य राजेंद्र शहाकार यांनी प्रात्यक्षिकांच्या सादरीकरणातून उपस्थितांना प्रशिक्षण दिले. घरी उपलब्ध असलेल्या पाण्याचा गुंड, खाली डबक्या, ड्रम, लाकूड, थर्मकॉल आदी टाकावू साहित्यांचा वापर करुन पाण्यावर तरंगणारे व बचावासाठी उपयुक्त ठरणाऱ्या वस्तूंच्या वापराबाबत मार्गदर्शन केले.

**दिव्यांगाच्या योजनांची जनजागृती व माजी सैनिकांचा सत्कार**

दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसना साठी राज्य शासना कडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसंबधी जिल्हा परिषदेचे दिव्यांग कल्याण अधिकारी श्री. शिंदे यांनी यावेळी माहिती दिली. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग व्यक्तींना प्रदान करण्यात आलेले अधिकार व सोयी–सुविधांबाबत त्यांनी यावेळी माहिती दिली.विभागीय आयुक्त कार्यालयातील माजी सैनिक पुरुषोत्तम काळे, वाल्मिक वानखडे यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुस्तक व गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला.नैसर्गिक आपत्तीच्यावेळी कशा पध्दतीने बचाव करावा याबाबत जिल्हा शोध व बचाव पथकाचे गणेश जाधव, दिपक पाल, भूषण वैद्य आदींनी यावेळी प्रात्यक्षिक सादर केलीत. विभागीय आयुक्त कार्यालयातील सर्व विभागांचे अधिकारी–कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रॅली जरांगेंची, मजा चोरांची; काही तासात ९ लाखांचा ऐवज गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३पुणे–** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंनी पुण्यात रविवारी शांतता रॅली काढली. या रॅलीला प्रचंड गर्दी झाली होती. या रॅलीत चोरट्यांचा प्रचंड सुळसुळाट पाहायला मिळाला. पुण्याच्या रॅलीमध्ये चोरट्यांनी हात साफ करताना तब्बल ९ लाखांचा मुद्देमाल चोरला अनेकांचे मोबाईल फोन, सोन्याच्या चेन, आणि रोख रक्कम चोरून नेलीय या संदर्भातल्या वेगवेगळ्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्यायत. चोरीच्या घटनांमध्ये ९ लाखांपर्यंतचा मुद्देमाल चोरीला गेल्याचा अंदाज आहे.



बाजीराव रोडवरच्या फुटका बुरुजाजवळ एका तरुणानं प्रणय पळसकर यांच्या गळ्यातून ९२ हजार किमतीची सोनसाखळी हिसकावलीय. पळसकर यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलीय. तर सारसबाग परिसरामध्ये प्रकाश सूर्यवंशी यांची ८५ हजारांची सोनसाखळी चोरांनी हिसकावलीय. स्वारगेट परिसरातल्या जेधे चौकात चोरट्यानं बाळासाहेब पिलावरे यांच्या खिशातून तब्बल ५७ हजार ५०० रुपयांची रोख रक्कमेवर डल्ला मारला.यासंदर्भात पिलावरे यांनी स्वारगेट पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलीय. तर सत्यवान जगताप यांची तब्बल ३ लाख ३० हजार किंमतीची सोनसाखळी चोरीला गेली. गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी हा डल्ला मारलाय. आता या चोरट्यांना शोधण्याचं मोठं आव्हान पोलिसांसमोर असणार आहे.

याआधीही जरांगेंच्या जालन्यातल्या रॅलीतही चोरट्यांनी हात साफ केला होता. या सभेतही मोबाईल, सोनसाखळी चोरीच्या घटना घडल्या होत्या. एवढंच नव्हे तर काही दुचाकीही या रॅलीमधून चोरीला गेल्याची तक्रार होती. आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय पक्षांसह जरांगेंच्या सभाही होणार आहेत. अशा सभांमध्ये चोरांचा बंदोबस्त करणं हे पोलिसांसमोर मोठं आव्हान असणार आहे.

# जि.प. माध्यमिक शाळेचा विद्यार्थी नैतिक फाळकेची जवाहर नवोदय विद्यालयाकरीता निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नांदगाव पेठ**
शैक्षणिक सत्र २०२३–२४ करिता घेण्यात आलेल्या केंद्रिय जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षेमध्ये येथील जि प. माध्य शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी नैतिक फाळके याची निवड झाली.शाळेच्या वतीने १९ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते मात्र त्यापैकी नैतिकने ही परीक्षा उत्तीर्ण केली असून अमरावती येथील जवाहर नवोदय विद्यालय नवसारी याठिकाणी त्याला प्रवेश मिळणार आहे.



शाळेमध्ये शिक्षकांनी जवाहर नवोदय परिक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांना गणित,इंग्रजी,विज्ञान व मराठी विषयाचे योग्य व सखोल मार्गदर्शन केले होते. नैतिकच्या निवडीमुळे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी कोठेही मागे नाहीत हे त्याने सिद्ध करून दिले.

नैतिकने मिळविलेल्या या यशामुळे शाळेचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण जामोदकर, सरपंच कविता डांगे, ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे, धनंजय वानखडे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अमरावती यांचे सह शिक्षकवृंद व पालकांनी अभिनंदन केले.

# राष्ट्रसंतांच्या महासमाधी वरून 'प्रबोधन वारी'चा सत्यपाल महाराजांच्या हस्ते शुभारंभ

## विदर्भात गाजणार सप्तखांजेरी व्दारे राष्ट्रसंतांच्या विचारांचा गजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नांदगाव पेठ**
गुरुकुंज मोझरी: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना करून राष्ट्रसेवेची योजना आखली होती त्यावेळी चाळीस हजार गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखा होत्या परंतु आज त्या शाखा झपाट्याने कमी होत असल्याचे दिसून येते. गावागावातील शाखा ना भेटी देऊन त्यांचे पुनर्बांधणी करण्याची गरज लक्षात घेता श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुल द्वारे 'वारी प्रबोधनाची' हा उपक्रम संपूर्ण विदर्भात राबविण्यात येणार आहे. याचे रीतसर उद्घाटन रविवारी पहाटे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधी स्थळावर सप्तखंजिरी वादक सुप्रसिद्ध कीर्तनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी, नामदेवराव गव्हाळे, इंजिनीयर भाऊसाहेब थुटे, ज्ञानेश्वर रक्षक, प्रेमकुमार बोके, नरेंद्र जीवतोडे, देविदास लाखे, नामदेव अस्वले, राज घुमणार, अमर वानखडे प्रशांत सुरोशे, रोशन ठाकरे, पवन खरासे इत्यादी कार्यकर्ता मंडळी व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध सप्तखंजरी वादक प्रबोधनकार संदीपपाल महाराज, रामपाल महाराज, पवन दवंडे ,तुषार सूर्यवंशी ,पंकजपाल महाराज,दीपक भांडेकर, दीपक नरताम, दिलीप भोयर, विकास चिडे ,उदयपाल महाराज, आकाश ताविडे, प्रदीपपाल चौधरी इत्यादी प्रबोधनकार मंडळींनी आपली उपस्थिती दर्शविली होती.

गाव हा विश्वाचा नकाशा आहे गावावरूनच देशाची परीक्षा केल्या जाऊ शकते म्हणून आदर्श राष्ट्राची निर्मिती करायची असेल त्यासाठी गाव हे आदर्श असले पाहिजे व आदर्श गाव होण्याकरिता आदर्श गावाची संहिता म्हणजे ग्रामगीता ही गावोगावी पोहोचली पाहिजे ग्रामगीतेचे प्रचारक हा विचार घेऊन गावा–गावांपर्यंत पोहोचुन तेथली युवकांना संघटित करून व प्रशिक्षित करून सेवा मंडळाचे कार्यकर्ते बनवल्या जाईल असा विश्वास वारीच्या उद्घाटन समारंभात प्रास्ताविक भाषणामध्ये बोलताना रवी मानव यांनी व्यक्त केला.




ही ही प्रबोधनाची वारी गुरुदेव सेवा मंडळासाठी नवचैतन्य निर्माण करणारी ठरणार आहे असा विश्वास सत्यपाल महाराज यांनी व्यक्त केला.

अनेक निष्ठावंत प्रचारकांनी कष्टाची शर्त लढवून गुरुदेव सेवा मंडळ गावागावात निर्माण केली होती आता ती सांभाळण्याची जबाबदारी तरुण कार्यकर्त्यांवर आलेली आहे व ते हे कार्य निष्ठेने करताना दिसतात याचे समाधान मला आहे असे उद्गार ज्येष्ठ प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांनी याप्रसंगी बोलून दाखवले.

शेकडो गुरुदेव भक्तांच्या उपस्थितीत हा उद्घाटन समारंभ पडला या समारंभाच्या यशस्वीतेसाठी सौ छाया मानव,प्रज्वल टोंगे, तुलसीदास झुंजुरकार, हर्ष बारापात्रे,आर्यन बोबडे, स्वप्निल बारापात्रे यांनी परिश्रम घेतले. अमर तावडे यांच्या मधुर आवाजात 'चलो अब सच कामोकी और' हे भजन सामूहिक रीत्या म्हणून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लाडकीला उत्तर देण्यासाठी मविआची 'महालक्ष्मी'
# 'लाडकी बहीण' विरुद्ध 'महालक्ष्मी'




विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३ मुंबई

राज्यात महायुतीनं विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर लाडकी बहीण योजना आणली. या योजनेसाठी पैसा कुठून आणणार असा सवाल मविआनं सरकारला वारंवार केला. वित्त विभागनंही याबाबच नाराजी व्यक्त केली. मात्र आता मविआनंही निवडणूक जिंकण्यासाठी यापेक्षा दुप्पट पैसे देणा-या महालक्ष्मी योजनेची घोषणा केलीय. मविआ सत्तेत आल्यास कर्नाटकाच्या धरतीवर महालक्ष्मी योजना आणणार असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी सांगितलं.

तर लाडकी बहीणविरोधात कोर्टात जाणा-या काँग्रेसला योजनेचे महत्त्व काय कळणा? असा सवाल भाजपनं केलाय. लाडकी बहीणला टक्कर देण्यासाठी काँग्रेसनं कर्नाटकातली ज्या गृहलक्ष्मी योजनेचा आधार घेतलाय ती नेमकी काय आहे ते पाहूयात.

### कर्नाटकातील गृहलक्ष्मी योजना काय?

कर्नाटकात गृहलक्ष्मी योजनेची काँग्रेसकडून सुरुवात, योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा २ हजार रुपये, आर्थिकदृष्ट्या वंचित व्यक्तींना भरीव आधार, दारिद्र्य रेषेखालील महिलांसाठी योजना, २ हजार रूपये थेट महिलांच्या खात्यात जमा.

राज्य सरकारवर साडे सात लाख कोटींचं कर्ज आहे. मात्र सत्ता मिळवण्यासाठी निवडणुकांच्या तोंडावनर नेहमीच लोकप्रिय घोषणांचा पाऊस पाडला जातो. लाडकी बहीणबाबत विरोधकांनी अशीच टीकेची झोड उठवली होती. मात्र या लडकी बहीणची धडकी भरल्यामुळेच आता मविआही त्याच मार्गावर जात असल्याचं दिसतंय. मात्र महायुतीच्या लाडकी बहीणवर मविआची महालक्ष्मी भारी ठरणार का? याकडेच सा-यांचं लक्ष लागलंय.

# शेतकऱ्यांची तूर संपल्यावर हरभरा पोहचला ७२५० रुपयांवर
# वर्षभरात पहिल्यांदा उच्चांकी भाव : आवक कमी, मागणी वाढली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३अमरावती



यंदा केंद्र शासनाने हरभऱ्याला ५,४४० रुपये क्विंटल हमीभाव जाहीर केला आहे. त्या तुलनेत वर्षभर दर पाच हजारांच्या दरम्यान राहिल्याने शेतकऱ्यांच्या पदरी उत्पादन खर्च पडलेला नाही.

सध्या साठवणूक केलेला हरभरा शेतकऱ्यांजवळ नाही. अशा परिस्थितीत आवक कमी झाली व सणासुदीच्या दिवसांत मागणी वाढली. नवीन हरभऱ्याला अवधी आहे. त्यामुळे हरभऱ्याला सोमवारी उच्चांकी ७,२७२ रुपये क्विंटल भाव मिळाला आहे. जमिनीत आर्द्रता कमी असल्याने गतवर्षी हरभऱ्याच्या सरासरी उत्पादनात कमी आली आहे.

**हंगामापूर्वीच सोयाबीन हमीभावाच्या आत**

केंद्र शासनाने सोयाबीनचा हमीभाव ४,८९२ रुपये क्विंटल असा जाहीर केला आहे. दीड महिन्यात नवे सोयाबीन बाजारात येणार आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी येथील बाजार समितीमध्ये सोयाबीनला ४१०० ते ४१७७ रुपये भाव मिळाला आहे. यामध्ये उत्पादन खर्च निघणे कठीण झाले आहे.

**हरभऱ्याचे बाजारभाव (रु/क्विं)**

| | |
|---|---|
| १५ जुलै | ६००० ते ६३५० |
| १९ जुलै | ६००० ते ६४०० |
| २४ जुलै | ६३०० ते ६५६० |
| ३१ जुलै | ६२०० ते ६५६२ |
| ५ ऑगस्ट | ६६५० ते ६९६९ |
| ७ ऑगस्ट | ६७०० ते ७०४० |
| १२ ऑगस्ट | ७००० ते ७२७२ |

# पट्टेदार वाघाचा शोध घेण्यासाठी वनविभागाचा जागते रहो! वनविभागाची जंगल भ्रमंती सुरू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३पोहरा



चिरोडी वनक्षेत्रात पट्टेदार वाघाने प्रवेश केल्याचे पायांच्या ठशांवरून सिद्ध झाल्याने वडाळी आणि चांदूर रेल्वे वनविभागाने ग्रामस्थांना खबरदारी घेण्याचे आव्हान केले आहे. पोहरा-चिरोडी वनविभागाद्वारे जंगल भ्रमंतीच्या माध्यमातून पट्टेदार वाघाच्या हालचालींवर लक्ष केंद्रित केले जात आहे. चिरोडी वर्तुळातील जंगलात पट्टेदार वाघाच्या पाऊलखुणा आढळून आल्या आहेत. तेव्हापासून चांदूर रेल्वे वनविभागाने वाघाचे मॉनिटरिंग सुरू झाले असून, जंगलातील गस्तवाढविली आहे.वाघाने कुठल्या भागात आपला घरोबा केला आहे याचा शोध घेण्यासाठी चांदूर रेल्वे वनविभाग प्रयत्नरत असून, जंगल मार्गावरून ये- जा करणाऱ्यांना, जंगलात शिरण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागरिकांना वाघाबद्दल सूचना देऊन सतर्क राहण्याचा इशारा सुद्धा दिला जात आहे. चप्प्याचप्प्यावर चिरोडी वनपाल, वनरक्षक, वनमजूर, संरक्षण मजूर तैनात असून, ते जंगलात जाणाऱ्यांकडे लक्ष ठेवूनच आहेत. त्यामुळे जंगल भागात वनविभागाने अलर्ट जारी केल्याचे चित्र दिसून येत आहे.

# महाराष्ट्रात 'कमिशनराज'! देशातील सर्वाधिक भ्रष्ट सरकार; रमेश चेनिथल्ला यांची टीका

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३बुलढाणा



लोकशाही मूल्यांची हत्या करून महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार सत्तेत आले आहे. हे जनादेश नसलेले सरकार देशातील सर्वात भ्रष्ट सरकार असल्याची घणाघाती टीका, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्र प्रभारी रमेश चेनिथल्ला यांनी येथे केली. सरकारची कार्यपध्दती लक्षात घेता सरकार मधे कमिशन राज चा नंगानाच सुरू असल्याचेही ते म्हणाले.

बुलढाणा येथे आज मंगळवारी, १३ ऑगस्ट रोजी काँग्रेस ची बुलढाणा, अकोला आणि वाशीम जिल्ह्याची विधानसभा निवडणूक आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला उपस्थित राहून मुख्य मार्गदर्शन करण्यासाठी प्रभारी रमेश चेनिथला आज येथे आले. आढावा बैठकीपूर्वी त्यांनी स्थानिय बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी येथे प्रसिद्धी माध्यमासोबत संवाद साधला. यावेळी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात, ज्येष्ठ नेते अनिस अहमद, प्रदेश काँग्रेस पदाधिकारी जयश्री शेळके, संजय राठोड,श्याम उमाळकर, आमदार सतेज पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल बोन्द्रे, आमदारद्वय राजेश एकडे व धीरज लिंगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना चेनिथला यांनी पक्षाची विधानसभेची तयारीविषयक माहिती देतानाच राज्यातील 'ट्रिपल इंजिन' सरकारवर टीकेची झोड उठविली. राज्यात युतीचे सरकार ५० टक्के कमिशन पध्दतीने काम करीत आहे. देशातील सर्वात भ्रष्ट असलेले हे सरकार मनमानी पद्धतीने लूट करीत आहे. सामान्य जनता आणि शेतकरी यांच्याशी सरकारला काहीच सोयरसुतक नसल्याचे सांगून देशातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहे.आम्ही केंद्रात असो वा राज्यात आमच्या (काँग्रेस आघाडी) सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्याचे काम केले आहे. सर्वाधिक शेतकरी आत्महत्या असूनही हे सरकार शेतकऱ्यांसाठी काहीच करायला तयार नाही . हे सरकार ढिम्म आणि असंवेदनशील असल्याचे सांगून सर्व उद्योग गुजरातला नेण्याचे काम करीत आहे. यामुळे महाराष्ट्र भकास होत असून युवकांचा हक्काचा रोजगार हिरावून घेण्याचे काम करण्यात येत असल्याचे म्हणाले.

# पाच वर्षांपासून पांदन रस्त्यांचे काम अपूर्ण

## पांदन रस्त्यांचे खडीकरणाचे काम सात दिवसांत पूर्ण न केल्यास अन्न/पाणी सोडणार : शेतकरी सागर हुरबडे यांनी दिला प्रशासनाला इशारा



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३अंजनगाव सुर्जी

पावसाळ्याला सुरूवात झाली असली तरी तालुक्यातील पांदण रस्त्यांची कामे पूर्ण झाली नसल्याचे दिसून येते. मजबूत असा पांदण रस्ता नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.प्रत्येक शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ता तयार करण्यासाठी पालकमंत्री शेत, पाणंद रस्ते योजना राबविण्यात आली होती. याकरिता अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ग्राम पंचायतींकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील तालुकास्तरीय समितीने हे प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविले. त्यापैकी काही रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ग्राम भडारज ते खिरकुड रस्ता व चौसाळा ते तुरखेड पांदन रस्त्यांचे काम पाच वर्षांपासून अपुर्ण अवस्थेत असल्याने शेतकऱ्यांना शेतामध्ये जाता येत नाही.यावर्षी पाऊस जास्त प्रमाणात होत असल्याने शेतकऱ्यांना घरात येणाऱ्या पिकांची चिंता पडली असून संत्रा तोडण्यासाठी येत असल्यावर संत्रा व्यापारी रस्त्याने वाहन येत नसल्याने संत्रा खरेदी करण्यासाठी येत नाही. या दोन्ही पांदन रस्त्याने संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात असुन शेतकऱ्यांचे रस्त्या अभावी लाखो रुपयांचे नुकसान होणार असल्याने शेतकरी सागर हुरबडे यांच्या नेतृत्वात सात दिवसांत पांदन रस्त्यांचे काम पूर्ण न केल्यास अन्न त्याग आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस श.पवार गटाचे तालुकाध्यक्ष प्रदीप पाटील येवले सागर हुरबडे यांनी प्रशासनाला दिला आहे.

> या पांदन रस्त्यांचे काम २०१९ ला सुरू झाले होते .कंत्राटदाराने माती काम करुन खडीकरण करणे आवश्यक होते मात्र कंत्राटदार यांच्या हेकेखोर पणाने व अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे या रस्त्यांचे खडीकरण झाले नाही त्यामुळे या रस्त्याने पावसाळ्यात जाणे येणे बंद झाले आहे वारंवार प्रशासनाला निवेदन दिले आता सात दिवसांत पांदन रस्त्यांचे खडीकरण पुर्ण न केल्यास बेमुदत अन्न त्याग आंदोलन करण्यात येणार आहे.
>
> **सागर हुरबडे शेतकरी भडारज**

# कु. प्राप्ती उगले या विद्यार्थिनीला नवी दिल्ली येथे होणाऱ्या स्वातंत्र दिन सोहळ्याचे निमंत्रण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३ अमरावती



प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनॅजमेन्ट, बडनेरा येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील नोंदणीकृत विद्यार्थिनी कु. प्राप्ती प्रमोदराव उगले हिची दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी लाल किल्ला नवी दिल्ली येथे होणाऱ्या स्वातंत्र दिन सोहळा पाहण्याकरिता विशेष अतिथी म्हणुन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मार्फत निवड करण्यात आलेली आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. हरकुट यांनी रासेयो स्वयंसेवीका कु. प्राप्ती प्रमोदराव उगले व रासेयो संघाचे कौतुक केले.महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्राप्ती प्रमोदराव उगले हिच्या निवडीचे तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. सौ. पूनामताई चौधरी, श्री पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा.गजानन काळे यांनी कौतुक केले.

# राज्यस्तरीय रेड रन स्पर्धेत अमरावतीचा बोलबाला : सलोनी लव्हाळे द्वितीय तर उजेर खान तृतीय स्थानी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३अमरावती




एच आई व्ही च्या जनजागृती साठी जणसामान्यांची भूमिका फार महत्वाची डॉ. विजय कंदेवाडअतिरिक्त प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई . जगभर साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा दिवस निमित्य राज्य स्तरीय रेड रन स्पर्धा ठाणे शहर येथे दिनांक १२ ऑगस्ट रोजी आयोजित केल्या गेली होती. सदर स्पर्धेचे सुरुवात अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ विजय कंदेवाड , डॉ. राहुल जाधव सहसंचालक, सुजित आकडकर सहसंचालक, डॉ लोकेश गभाने सहासंचालक, सुद्देशना चक्रवर्ती सहसंचालक यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये झेंडी दाखवून करण्यात आली. सदर स्पर्धेयेतील प्रथम विजेत्याला पुढील महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्तरीय स्पर्ध्ये साठी निवड झालेली असून ते त्या स्पर्ध्ये मध्ये भाग घेतील.

या स्पर्ध्ये मध्ये जिल्ह्यातील डॉ गोडे फार्मसी महाविद्यालय मधील रेड बिंन क्लब च्या कु. सलोनी लव्हाळे आणि केशरबाई लाहोटी महाविद्यालयचा उजेर खान या सोबतच इतर जिल्ह्यातील विजेता स्पर्धाकांनी सहभाग नोंदवीला. या स्पर्ध्ये मध्ये मुलीनं मध्ये श्वेता पावरा धुळे प्रथम, सलोनी लव्हाळे दुतीय (१९ मिनिटे १६ सेकंद )व योगश्री सोळंके धाराशिव तृतीय तर मुलांन मध्ये मुकेश धारफजर जळगाव प्रथम, अतुल जाधव छत्रपती संभाजी नगर दुतीय व उजेर खान (१६ मिनिटे ९ सेकंद) अमरावती* तृतीय स्थानी होते. विजेत्यांना रोख रक्कम, चषक , प्रमाणपत्र व मेडल प्रदान करण्यात आले.या वेळी मार्गदर्शन करताना डॉ विजय कंदेवाड अतिरिक्त प्रकल्प संचालक यांनी एच आई व्ही ची संक्रमाणाची तीव्रता कमी करण्यासाठी झालेल्या जनजागृती मध्ये जाणसामान्यांची भूमिका फार महत्वाची आहे असे सांगितले. या वेळी या स्पर्ध्येचे नियम, मार्ग आणि मार्गदर्शन डॉ राहुल जाधव यांनी केले.या स्पर्धेयेचा बक्षीस वितरण समारंभ मा. डॉ विजय कंदेवाड यांच्या अध्यक्ष ते खाली घेण्यात आला या वेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ शंभरकर सहसंचालक, डॉ अशोक नंदापूरकर उप संचालक आरोग्य सेवा मंडळ ठाणे, डॉ कैलास पवार जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे, डॉ गंगाधर परगे जिल्हा आरोग्य अधिकारी ठाणे, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे सर्व सहसंचालक, उप संचालक, सहयोगी संचालक, अधिकारी कर्मचारी, विविध जिल्ह्यातून आलेले स्पर्धक, पालक वर्ग, शिक्षक तसेच एच आई व्ही कार्यक्रमाचे कार्यक्रम अधिकारी, जिल्हा पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थीनींना कॉलेजने शुल्क मागितल्यास होणार कारवाई;

## सरकारनं जाहीर केले हेल्पलाईन नंबर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

राज्य सरकारनं विद्यार्थीनींना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण मोफत केलं आहे. त्यामुळे आता महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी मुलींना शुल्क भराव लागणार नाही. मात्र, तरीही काही महाविद्यालये त्यांच्याकडून शुल्क वसूल करत आहेत, अशा तक्रारी आल्या आहेत. याविरोधात आता उच्च व तंत्रशिक्षण विभागानं कडक पावलं उचलली आहेत. त्यानुसार, जी महाविद्यालये विद्यार्थीनीकडं शुल्क मागतील त्यांच्याविरोधात तक्रारींसाठी हेल्पलाईन क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले आहेत.




यासंदर्भात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयानं ट्विट करुन माहिती दिली आहे. यामध्ये म्हटलं की, मुलींना मोफत उच्च शिक्षणाबाबत समस्या आल्यास सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत ०७९६९१३४४४० आणि ०७९६९१३४४४१ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच http:// helpdesk. maharashtracet.org या हेल्पलाइन तिकीट लाईनवरही संपर्क साधता येईल, असं आवाहन उच्च व तंत्रशिक्षण विभागानं केलं आहे.

महाराष्ट्र सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागानं ही योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार, या वर्षीपासून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना ट्युशन आणि परीक्षा फीमध्ये शंभर टक्के सवलत जाहीर केली आहे. यामुळं सहाजिकच संपूर्ण फी माफ असणार आहे. पण यासाठी पालकांचं उत्पन्न हे ८ लाखांपेक्षा कमी असणं गरजेचं आहे. या उत्पन्नापेक्षा अधिक उत्पन्न असल्यास विद्यार्थीनी पूर्ण फी भरावी लागणार आहे.

### योजनेचा हेतू काय ?

विद्यार्थीनींनी फी माफी करण्यामागं सरकारचा विशिष्ट अजेंडा आहे. त्यानुसार, मुलींची व्यावसायिक शिक्षणातील संख्या वाढावी तसंच त्यांना शिक्षण घेण्यात मुलांसारखीच संधी मिळावी. महिला सशक्तीकरणासाठी घेण्यात आलेल्या या पुढाकारामुळं मुलींना केवळ आर्थिक पाठबळ नसल्यानं व्यावसायिक शिक्षणाच्या संधींपासून मुकावं लागू नये, हा यामागचा हेतू आहे.

# महायुतीच्या समन्वय बैठकीचे रवी राणांना निमंत्रण नाही ?

## आमदार बच्चू कडू यांना निमंत्रण देण्यात आले असतांना त्यानी फिरवली पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील महायुती सरकारने जोरदार तयारी सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या जोरदार राजकीय संघर्षानंतर संपूर्ण राज्याला आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला विदर्भात चांगले यश मिळाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मविआ याच कामगिरीची पुनरावृत्ती करणार का, की महायुती या धक्क्यातून सावरत पुन्हा कमबॅक करणार, याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. अशातच, आज अमरावतीमध्ये महायुतीच्या समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला पश्चिम विदर्भातील महायुतीचे प्रमुख पदाधिकारी बैठकीत सहभागी झाले होते.



विशेष म्हणजे या बैठकीसाठी स्थानिक नेते म्हणून आमदार बच्चू कडू यांना निमंत्रण देण्यात आले असताना आमदार रवी राणा यांना मात्र निमंत्रण दिले नसल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे अनेक चर्चांना सध्या उधाण आले असून आमदार रवी राणा यांनी नुकतेच केलेलं लाडकी बहीण योजनेवरील वादग्रस्त वक्तव्य त्यांना आता भोवलंय का? असा प्रश्नही या निमित्याने उपस्थित केला जात आहे.अमरावतीच्या सांस्कृतिक भवनात तीनही पक्षाची पदाधिकाऱ्यांची या समन्वय बैठकीला हजेरी असणार आहे. तर पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाण्यातली महायुतीचे खासदार,आमदार आणि पदाधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहे. शिवसेना शिंदे गटाकडून मंत्री उदय सामंत, भाजपकडून आमदार प्रसाद लाड, सचिन जोशी, आशिष कुलकर्णी, संजय खोडके इत्यादि प्रमुख नेते या बैठकीला मार्गदर्शन केले

महत्वाचे म्हणजे या बैठकीसाठी स्थानिक नेते म्हणून प्रहारचे आमदार आणि गेल्या काही दिवसापासून सरकारवर निशाणा साधणारे बच्चू कडू यांना या बैठकीचे निमंत्रण देण्यात आले आहे असले तरी बच्चू कडु हे उपस्थित नव्हते तर दुसरीकडे आमदार रवी राणा यांना मात्र निमंत्रण दिले नसल्याने अनेक चर्चांना सध्या उधाण आले आहे. त्यामुळे महायुतीतील उच्चपदस्थ नेते आमदार रवी राणांवर नाराज तर नाही ना? असा प्रश्नही या निमित्याने आता उपस्थित केला जात आहे.

# आता एकाच नगराध्यक्षाचा काळ पाच वर्षांचा : मंत्रिमंडळ बैठकीत झाला निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**

आगमी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये नगराध्यक्षांचा कालावधी आता अडीच वर्षाऐवजी पाच वर्ष करण्यात आला आहे. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नगराध्यक्षांचा कालावधी ५ वर्षे करण्याला मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी अडीच-अडीच वर्ष असे दोन नगराध्यक्ष पाच वर्षात होत होते. आता एकाच नगराध्यक्षाचा काळ पाच वर्षांचा



असणार आहे.

मंत्रिमंडळाच्या या बैठकीत विदर्भ व मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देण्यासाठी पशूसंवर्धन व दुग्धविकास यासाठी १४९ कोटीस मान्यता देण्यात आली आहे. तर मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. या निर्णयाचा मराठवाड्यातील लाखो नागरिकांना लाभ होणार आहे.

डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना जाहीर करण्यात आली आहे. यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला.शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकाना ठोक मानधन दिले जाणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी सुधारित ३७ हजार कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. यासोबतच सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्यात येणार आहे.

# नागरिकांच्या हितासाठी व्यापक धोरण राबविण्यासाठी दवाबगट निर्माण करणार

## अमरावती येथे पार पडली हरित महाराष्ट्र संवाद यात्रेची पहिली सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

आज आपल्या देशात आणि संपूर्ण जगभरात विकासाच्या नावाखाली निसर्गाचा मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. निसर्ग हा आपल्या अस्तित्वाचा आधार आहे म्हणूनच आपल्या विकासाच्या धोरणात निसर्ग आणि पर्यावरणाला महत्त्व देणे गरजेचे आहे. त्यासाठी राजकीय नेत्यांकडून व पक्षाकडून पर्यावरणाच्या प्रश्नांना राजाश्रय मिळने गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रपूर येथील इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे यांनी हरित महाराष्ट्र संवाद यात्रेची सुरुवात केली आहे. या अंतर्गत ते संपूर्ण राज्यात जाऊन पर्यावरणप्रेमी यांचेशी चर्चा करून स्थानिक पातळीवरील प्रश्न जाणून घेत राज्यभरातील पर्यावरण व सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती समूह एकजूट करीत राजकीय पक्षातर्फे त्यांच्या घोषणापत्रामध्ये राज्यातील पर्यावरण व विकास यात दुवा म्हणून नागरिकांच्या हितासाठी व्यापक धोरण राबविण्यासाठी दवाबगट निर्माण करण्यात येणार आहे.

'हरित महाराष्ट्र संवाद यात्रे'ची पहिली सभा अमरावती येथे रविवार दिनांक ११ ऑगष्ट रोजी पार पडली. या सभेला अमरावती शहरातील पर्यावरण संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय पक्षांचे पदाधिकारी




यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम हरित महाराष्ट्र संवाद यात्रेचे प्रणेते बंडू धोतरे यांचे अमरावतीकरांच्या वतीने डॉ. गजानन वाघ यांनी स्वागत केले. या सभेचे निमंत्रक डॉ. जयंत वडतकर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सध्याच्या स्थानिक तथा देशव्यापी पर्यावरण विषयक प्रश्नांची सध्यस्थितीवर प्रकाश टाकला.बंडू धोतरे यांनी हरित महाराष्ट्र संवाद यात्रेची भुमिका विषद करून येत्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पर्यावरण व सामाजिक क्षेत्रातील संस्था- संघटना- व्यक्ती यांचेशी संवाद साधला आणि शासन स्तरावर पर्यावरणाचे कुठले महत्त्वाचे प्रश्न मांडले जावेत याबाबत उपस्थितांचे मते जाणून घेतली. या सभेत उपस्थित सर्वच पर्यावरण प्रेमींनी आपले विचार व्यक्त करुन स्थानिक पातळीवरील विविध प्रकारचे पर्यावरण प्रश्नांवर चर्चा केली.

यामाध्यमाने स्थानिक पर्यावरण व सामाजिक प्रश्नासाठी सर्व संस्था-संघटना एकत्रित लढा कसा उभारू शकतील, त्यांच्यातील संवाद आणि नागरिकांची साथ यावर प्रकाश टाकण्यात आला, लोकचळवळ निर्माण करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली. सोबतच राज्य आणि देश पातळीवरील अनेक पर्यावरणीय प्रश्न ध्येय धोरणे आणि कायदे यात केले जाणारे बदल, भांडवलशाहीस पोषक तर मानवाच्या दृष्टीने आवश्यक पर्यावरणीय बाबी याविषयी पुढील बैठकांच्या माध्यमाने अधिकाधिक लोकांना जोडून व्यापक अभियान आणि कार्यक्रम, राबविण्याबाबत, सभेचे नियोजन बाबत चर्चा करण्यात आली. आज आपल्या देशाला लाभलेली संपन्न निसर्ग संपदा भावी पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. आपले संविधानही निसर्गाच्या संवर्धनाचे आवाहन करते. म्हणूनच आपल्याला निसर्गाच्या ऱ्हासाला आळा बसवण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत बंडू धोतरे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला अमरावती येथील विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेचे समन्वय डॉ. सावन देशमुख यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

# ज्वालामुखी जगदंबा, एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्थेवर कारवाई करा : जिल्ह्यातील मजुर संस्थेची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

मजुर सहकारी संस्थेला काम घेताना आर्थिक प्रमाणपत्र, ना हरकत प्रमाणपत्र असे जिल्हा मजूर सहकारी संस्था संघाचे घेणे बंधनकारक आहे असा शासनाचा अध्यादेश असताना विनाकारण जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था व जिल्हा सहकारी संस्थाचा संघ, उपजिल्हा निबंधक यांना वेठीस धरणाऱ्या शेलुगुंड येथील ज्वालामुखी जगदंबा व वाघोली अमरावती येथील एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्थेवर कारवाई करण्याची मागणी पत्रकार परिषदेत जिल्ह्यातील तब्बल ६२ मजूर संस्थांनी केली आहे



अमरावती जिल्ह्यात असलेल्या मजूर सहकारी संस्थांना पारदर्शकपणे व्यवस्थित विविध विभागाची कामे मिळावी म्हणून अमरावती जिल्हा मजुर सहकारी संस्थाचा संघ कार्यान्वित आहे. मात्र या मजूर संघाच्या विरोधात शेलुगुंड येथील ज्वालामुखी जगदंबा मजूर संस्थेचे अध्यक्ष नितीन जोशी तसेच वाघोली अमरावती येथील एम.आय.डी.सी. प्रकल्पग्रस्त चे अध्यक्ष दीपक खडसे वारंवार मजूर संघाची तसेच जिल्हा उप निबंधक यांची तक्रार करून वेठीस धरून ब्लॅकमेलिंग करण्याचे प्रकार करीत आहे.

जिल्ह्यातील कोणत्याही मजूर संस्थेला आर्थिक प्रमाणपत्र पाहिजे असेल तर जील्हा मजूर संघाच्या वतीने सदर प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याचा ३० जून २०२० ग्रामविकास विभागाचा निर्णय आहे तसेच ई निविदा प्रक्रियेत विविध विभागामार्फत कामे घेताना जिल्हा मजुर सहकारी संघाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे तसा सहकार व पणन विभागाचा १४ जुलै २०२३ शासकीय अध्यादेश आहे या या दोन्ही शासन निर्णयाची जिल्हा मजूर सहकारी संस्थाचा संघ व्यवस्थितपणे अंमलबजावणी करीत असून जिल्ह्यातील सर्व मजूर सहकारी संस्थांना कामे नियानीत पने मिळत आहे.

**ज्वालामुखी जगदंबा व एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्थेचा ब्लॅकमेलिंग चा प्रकार**

ज्या मजूर संस्थेला काम पाहिजे त्यांना जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे अर्ज करावा लागतो त्या नमितीमध्ये सदर कामे मिळाले जातात यात मजूर संघाचा कुठेही हस्तक्षेप राहत नसताना केवळ आपल्यालाच कामे मिळाली पाहिजे म्हणून दोन्ही मजूर संस्थेचे अध्यक्ष नितीन जोशी व दीपक खडसे वारंवार ब्लॅकमेलिंग दबावतंत्र निर्माण करण्याचा प्रकार करीत आहे वास्तविक पाहता सदर दोन्ही संस्थे जिल्हा परिषद बांधकाम विभागा मध्ये कोट्यावधीची कामे मागील दोन ते तीन वर्षात झालेली असल्याच माहिती यावेळी जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे संघाचे संचालक अशोकराव दुधंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**दोन्ही मजूर संस्थेवर कारवाई करा**


अमरावती जिल्ह्यात असलेल्या मजूर सहकारी संस्थाचा व जिल्हा मजूर संघाचा कारभार व्यवस्थित सुरू असताना केवळ दोन्ही मजूर संस्थेचे अध्यक्ष जिल्हा मजूर संस्थाचा संघ, जिल्हा उपनिबंधक यांची बदनामी करीत आहे एकीकडे शेलूगुड येथील ज्वालामुखी, जगदंबा मजूर संस्थेचे अध्यक्ष नितीन जोशी यांनी आपल्या संस्थेत जे सभासद आहे ते त्या सभासदांना माहीत नसल्याचे उघड झाले आहे त्यांच्या खोट्या साक्षरी मारण्याचा प्रकारे पुढे आला आहे वाघोली येथील एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्थेचे अध्यक्ष दीपक खडसे यांनी मालखेड येथे मत्स्य विभागाची असलेल्या जागेवर अतिक्रमण करून सदर जागा बडकवण्याचा प्रयत्न केला होता ते महसूल उपविभाग चांदुर रेल्वे यांनी काही दिवसापूर्वीच उघड केले आहे विशेषता जिल्हा मजूर सहकारी संस्था संघाच्या अध्यक्षांच्याही खोट्या सह्या मारून खोटे आर्थिक पात्रता प्रमाणपत्र कामे मिळण्यासाठी तयार केले होते जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था, जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा संघ व जिल्हा उप निबंधक यांना वेठीस धरणाऱ्या ज्वालामुखी जगदंबा व एमआयडीसी प्रकल्पग्रस्त या दोन्ही मजूर सहकारी संस्थावर त्वरित कारवाई करावी अशी मागणी जिल्ह्यातील सर्वच मजूर सहकारी संस्थांनी आजच्या पत्रकार परिषदेत केली आहे या पत्रकार परिषदेला जिल्हा मजूर सहकारी संस्था संघाचे अध्यक्ष मो तनवीर सादिक काजी, उपाध्यक्ष साहेबराव माकोडे, संचालक अशोक दुधंडे, माधव शेंडे, नंदकिशोर मोहोड, अझर खान हबीब खान, स्वप्नील भुयार,, व मजूर संस्थांचे प्रवीणबमनोटे, आनंदवर्धन आडीकने, सुशील शिंदे, सतीश काटोलकर, प्रमोद गिरनाळे, जगन राउत, मुकेश वाहुरवाघ, प्रकाश गावंडे, शंकरराव काळे, दीपक काळे, अमित केंडे, सतीश मोहोड तसेच जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था चे अध्यक्ष, सचिव उपस्थित होते.

# मान्सून अलर्ट : मध्य भारतात पुन्हा सक्रिय होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर**

राज्यासह देशभरात अनेक ठिकाणी 'मान्सून'च्या हालचाली मंदावल्याचे चित्र आहे. मात्र, आता पुन्हा एकदा मान्सून सक्रिय होण्याचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. येत्या १५ ऑगस्टपर्यंत पावसाची वाटचाल संथ राहील, पण त्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस म्हणजेच २३-२४ ऑगस्टच्या दरम्यान मध्य भारतातील अनेक भागात पुन्हा एकदा मान्सूनच्या हालचाली तीव्र होण्याची शक्यता आहे.

राज्यातील हवामानात गेल्या आठवडाभरापासून मोठ्या प्रमाणात बदल होतांना दिसून येत आहे. राज्यातील बहुतांश भागात पावसाने विश्रांती घेतली होती, पण पुन्हा आता हवामानात बदल होताना दिसून येणार आहेत. भारतीय हवामान खात्याने राज्यातील सहा जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. एवढेच नाही तर काही भागात वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाचा देखील



इशारा देण्यात आला आहे. अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि वाशीमसह महाराष्ट्रातील अनेक भागात येलो अलर्ट देण्यात आला आहे.पावसाचा जोर अनेक जिल्ह्यांत कमी झाला असला तरी काही ठिकाणी आजही जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्येही आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुंबई, नाशिक, पुणे येथे पावसाच्या हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळतील. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला पावसाने विश्रांती घेतली होती. पण आता पाऊस परतत आहे.

राज्यात आज काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यातील जालना, परभणी या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर बीड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड या जिल्ह्यात विजांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये यावेळी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला आहे.

# महापालिकेच्या वतीने हर घर तिरंगा यात्रा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडुन हर घर तिरंगा ही मोहिम सुरु करण्यात आली होती. सदर मोहिम लोकांना तिरंगा घरी आणण्यासाठी आणि भारताच्या स्वातंत्र्याची ओळख म्हणुन तो फडकवण्यासाठी प्रोत्साहित करते. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करुन भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरुकता निर्माण करते. याच अभियानाचा भाग म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार हर घर तिरंगा म्हणजेच घरोघरी तिरंगा या अभियाना अंतर्गत महानगरपालिका उत्तर झोन व महानगरपालिका पुर्व झोनच्या वतीने दिनांक १३ ऑगस्ट,२०२४ रोजी मनपा झोन क्र.१ रामपुरी कँम्प व मनपा झोन क्र.३ दस्तुरनगर पासुन तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचा प्रारंभ सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या हस्ते झाला.

या यात्रेदरम्यान अमरावती महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच नागरिकांनीही या मोहिमेत उत्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

यावेळी यात्रेची सुरुवात होणाऱ्या मनपा उत्तर झोन क्र.१ व मनपा पुर्व झोन क्र.३ या ठिकाणी महापालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्र येऊन तिरंगा प्रतिज्ञेचे वाचन केले. या यात्रेमध्ये शहरातील विविध गट, युवा स्वंयसेवक, विद्यार्थी, स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वंयसेवी संस्था, बचत गट इत्यादींनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला होता. सदरील तिरंगा यात्रा मनपा उत्तर झोन क्र.१ व मनपा पुर्व झोन क्र.३ पासुन सुरुवात होऊन शहरातील विविध ठिकाणावरुन प्रभागनिहाय मार्गक्रमण करुन मनपा उत्तर झोन व मनपा पुर्व झोन येथे या यात्रेचा समारोप करण्यात आला. या यात्रेमध्ये शहरातील सर्व नागरिकांनी १५ ऑगस्ट रोजी आपापल्या घरावर एक तिरंगा झेंडा लावण्याचे आवाहन केले आहे.